दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे | अंक -२४८ रविवार,दि.११ मे २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४
Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-248 | Sunday, Dt.11 May 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

## श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे सोमवार रोजी विष्णु महाराज आंतरकर यांचे कीर्तन

बीड (प्रतिनिधी)

विसाव्या शतकातील महान संत .किसनबाबा यांच्या २७ व्या वर्षातील नववी पुण्यतिथी वैशाख शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प. विष्णु महाराज आंतरकर श्रीक्षेत्र देवाची आळंदी यांचे सोमवार दिनांक १२ मे २०२५ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे अवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व समस्त गावकरी जुजगव्हाण यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.

# भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धबंदीची घोषणा

## परराष्ट्र सचिव म्हणाले- आता जमीनी आणि हवाई हल्ले करणार नाही; संध्याकाळी ५ वाजता सहमती

प्रतिनिधी @ नवी दिल्ली

भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धबंदी आहे. विक्रम मिस्री म्हणाले की, दोन्ही देश युद्धबंदीसाठी तयार आहेत. ५ वाजल्यापासून जमिनीवर, आकाशात आणि युद्धात युद्धबंदी झाली आहे. उ्रूत्वज १२ तारखेला दुपारी १२ वाजता चर्चा करतील.याआधी भारत आणि पाकिस्तान एकमेकांविरुद्ध लष्करी कारवाई करत होते. परराष्ट्र आणि संरक्षण मंत्रालयाने शनिवारी सकाळी १०:३० वाजता पत्रकार परिषद घेऊन सद्य परिस्थितीची माहिती दिली. थोड्याच वेळात पुन्हा पत्रकार परिषद होईल.

आज सकाळी कर्नल सोफिया कुरेशी म्हणाल्या की, पाकिस्तानने जम्मू आणि काश्मीरमधील उधमपूर, पंजाबमधील पठाणकोट, आदमपूर आणि गुजरातमधील भूज एअरबेसवर हायस्पीड क्षेपणास्त्रांनी हल्ला केला, ज्यामुळे आमचे नुकसान झाले.पाकिस्तानने रुग्णालये आणि शाळांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न केला, जो भारताने हाणून पाडला. ब्राह्मोस सुविधा नष्ट केल्याचा पाकिस्तानचा दावा खोटा आहे. भारतीय एस-४०० संरक्षण प्रणाली देखील पूर्णपणे सुरक्षित आहे.पत्रकार परिषदेत



कर्नल सोफिया कुरेशी, विंग कमांडर व्योमिका सिंग आणि परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री उपस्थित होते.

पाकिस्तानी सैन्याने संपूर्ण पश्चिम आघाडीवर आपल्या आक्रमक कारवाया सुरू ठेवल्या आहेत. त्यात युकॅब ड्रोन, लांब पल्ल्याची शस्त्रे, हलकी प्रतिकारशक्ती आणि लढाऊ विमाने वापरली आहेत. भारतीय लष्करी पायाभूत सुविधांना लक्ष्य करण्यात आले आहे.नियंत्रण रेषेवर ड्रोन घुसखोरी आणि जड शस्त्रास्त्रांचा गोळीबारही झाला. श्रीनगर ते धालियापर्यंत आंतरराष्ट्रीय सीमा आणि नियंत्रण रेषेवर २६ हून अधिक ठिकाणी हवाई घुसखोरीचे प्रयत्न करण्यात आले.भारतीय सशस्त्र दलांनी बहुतेक धोके यशस्वीरित्या निष्प्रभ केले. तथापि, उधमपूर, पठाणकोट, आदमपूर आणि भूज, भटिंडा येथील हवाई दलाच्या स्थानकांमधील उपकरणे आणि अधिकाऱ्यांचे नुकसान झाले आहे.



## जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केली जिल्हा रुग्णालयाची पाहणी

बीड (प्रतिनिधी)

बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज जिल्हा रुग्णालयाची अचानक पाहणी करत रुग्णसेवा, वैद्यकीय सुविधा आणि व्यवस्थापनाची सखोल माहिती घेतली. त्यांनी रुग्णालयातील विविध विभागांना भेट देऊन रुग्णांशी आणि कर्मचाऱ्यांशी थेट संवाद साधला.

पाहणी दरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी ओपीडी, इनडोअर वॉर्ड, औषध वितरण कक्ष, ऑपरेशन थिएटर, महिला व बालरोग विभाग, तसेच प्रयोगशाळा विभागांची तपासणी केली. रुग्णांकडून उपचार, औषधे, स्वच्छता आणि कर्मचारी वर्गाच्या वागणुकीबाबत थेट माहिती घेतली. काही रुग्णांनी समाधान व्यक्त केले तर काहींनी किरकोळ अडचणी मांडल्या.

जिल्हाधिकाऱ्यांनी रुग्णालय प्रशासनाला सूचना दिल्या की, प्रत्येक रुग्णाला दर्जेदार सेवा मिळायला हवी. त्यांनी यंत्रणांमध्ये पारदर्शकता, वेळेवर उपचार आणि स्वच्छतेवर भर देण्याचे निर्देश दिले. या पाहणीत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत, आरएमओ डॉ. संतोष शहाणे, बाह्य विभागाचे आरएमओ डॉ. लक्ष्मीकांत, डॉ. हनुमंत पारखे, मुख्य अधीसेविका रमा गिरी, प्राचार्य डॉ. सुवर्णा बेदरे आणि इतर विभागप्रमुख उपस्थित होते.

पाहणीच्या शेवटी जिल्हाधिकाऱ्यांनी चांगली सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांचे कौतुक करून त्यांना शाब्बासकी दिली. काही विभागांमध्ये तातडीने सुधारणा करण्याचे आदेशही त्यांनी दिले. जिल्हाधिकाऱ्यांच्या या पाहणीमुळे आरोग्य यंत्रणेत जागरूकता वाढणार असून, नागरिकांना अधिक चांगल्या सेवा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. रुग्णालय प्रशासनाने त्यांच्या सूचनांचे तात्काळ पालन करण्याचे आश्वासन दिले आहे.




## थोड्याच दिवसांत परळीचे नाव सकारात्मक दृष्टीने घेतले जाईल - मयंक गांधी

### शाही थाटात संपन्न झाला सामुदायिक विवाह सोहळा! ग्लोबल विकास ट्रस्ट आणि बोरोसिल परिवाराचे परळीकरांकडून आभार

प्रतिनिधी @ परळी

चुकीच्या घडलेल्या घटनांमुळे मागील काही दिवसांत परळीचे नाव बाहेर खराब अर्थाने घेतले जात आहे. परळीची झालेली ही ओळख आपल्याला पुसून टाकायची असून समाजोपयोगी कामांनी आपली ओळख भविष्यात सकारात्मक दृष्टीने झालेली असेल. यासाठी आपल्याला सर्वांना सोबत घेऊन सर्वांचा उत्कर्ष साधण्यासाठी मोठी सामाजिक चळवळ उभी करायची असून त्यासाठी प्रत्येकाचे योगदान महत्वाचे असल्याचे प्रतिपादन ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी यांनी केले. ग्लोबल विकास ट्रस्ट आणि बोरोसिल परिवार यांच्या वतीने शनिवारी परळीत सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते, याप्रसंगी नववधू वरांना शुभेच्छा देताना ते बोलत होते.शनिवार, दिनांक १० मे रोजी परळी वैजनाथ येथे ग्लोबल विकास ट्रस्ट आणि बोरोसिल परिवार यांच्या वतीने सामुदायिक विवाह सोहळा थाटात संपन्न झाला. या विवाह सोहळ्यात ११ नवदाम्पत्य विवाह बंधनात अडकले. ट्रस्टकडून नवदाम्पत्याला सर्व संसारोपयोगी वस्तू तर देण्यात आल्याच मात्र त्यासोबतच नववधूच्या नावाने ७० हजार रुपयांची मुदत ठेव ठेवण्यात आली. विशेष म्हणजे हा सोहळा संपन्न होत असताना हुंडा देणार नाही आणि घेणार नाही अशी सर्वांनी शपथ घेतली. या विवाह सोहळ्यास सामाजिक कार्यकर्ते तथा नामांकित शल्यविशारद डॉ.हरिश्चंद्र वगे, डॉ.संतोष मुंडे, माजी नायब तहसीलदार बाबुराव रूपणर, खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांचे चिरंजीव सौरभ सोनवणे यांच्यासह विविध क्षेत्रातील हजारो मान्यवर शुभाशीर्वाद देण्यासाठी उपस्थित होते. या आगळ्यावेगळ्या सोहळ्याचे सर्वत्र कौतुक केले जात असून, गोरगरीब कुटुंबातील मुला मुलींच्या विवाहास मोठा हातभार लागल्यामुळे ग्लोबलचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी यांचे सर्वांच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

आगळ्यावेगळ्या सोहळ्याचे कौतुक

ग्लोबल विकास ट्रस्ट आणि बोरोसिल परिवार यांच्या वतीने आयोजित सामुदायिक विवाह सोहळा हा अगदीच आगळावेगळा सोहळा असल्याची सर्वत्र चर्चा झाली. हुंडा घेणार नाही आणि देणार नाही अशी सर्वांना या सोहळ्यात शपथ देण्यात आली तर संपूर्ण सोहळा पर्यावरण पुरक करण्याच्या अनुषंगाने प्लॅस्टिकचा शून्य वापर करण्यात आला. या सोहळ्यास हजारो मान्यवर नागरिकांची उपस्थितीत होती.






## नारायणगड परिसर विठ्ठल नामाच्या गजराने दुमदुमला

प्रतिनिधी @ बीड

धाकटी पंढरी म्हणून ओळख असलेल्या नारायणगड येथे मोहिनी एकादशीनिमित्त हजारो भाविकांनी दर्शन घेतले. शिरूर कासार तालुक्यातील या गडावर जिल्हाभरातून आलेल्या शेकडो दिंड्यांमधील वारकऱ्यांनी टाळ मृदंगाच्या गजरात विठ्ठल नामाचा जयघोष केला. ज्ञानेश्वर माऊली आणि विठ्ठल नामाच्या घोषाने परिसर दुमदुमला होता.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

संपादकीय

## ‘लोक’राज्याची दवंडी

सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्यांत घेण्याचे आदेश दिले आहेत, ज्यामुळे प्रशासक राजवट संपुष्टात येणार आहे. ओबीसी आरक्षणासह निवडणुका होतील, पण अंतिम निर्णय न्यायालयीन निकालावर अवलंबून असेल. या निर्णयामुळे राज्यातील विकासकामांना गती मिळण्याची शक्यता आहे, कारण आता लोकप्रतिनिधींच्या हाती कारभार येणार आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रखडलेल्या निवडणुका चार महिन्यांत घेण्याचा आदेश देऊन सर्वोच्च न्यायालयाने एका अर्थाने गेली तीन ते पाच वर्षे निपचित पडलेल्या स्थानिक लोकशाहीला पुन्हा जागे केले आहे. या आदेशामुळे राज्यातील २९ महापालिका, २६ जिल्हा परिषदा, २८९ पंचायत समित्या आणि २५७ नगरपालिकांमधील ‘प्रशासक राज’ संपुष्टात येऊन, स्थानिक कारभार लोकप्रतिनिधींच्या हाती येणार आहे. या संदर्भातील खटल्यांमध्ये महत्त्वाचा मुद्दा असलेल्या इतर मागासवर्गाच्या (ओबीसी) आरक्षणाबाबतही सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशामुळे, आधीच्या २७ टक्के आरक्षणासह या निवडणुका होणार आहेत. मात्र, ‘ओबीसी’ आरक्षणाबाबतची सुनावणी सुरूच राहणार असून, त्यासाठी निवडणुका लांबणीवर टाकण्याची गरज नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे. त्यामुळे निवडून येणाऱ्या ‘ओबीसी’ लोकप्रतिनिधींचे भवितव्य त्या खटल्याच्या अंतिम निकालाच्या अधिन असेल. येत्या चार आठवड्यांत निवडणुकांची अधिसूचना काढावी आणि चार महिन्यांत प्रक्रिया पूर्ण व्हावी, असे न्यायालयाने आदेशात नमूद केले आहे. त्यामुळे अपवाद वगळता जवळपास संपूर्ण राज्याला पडलेल्या नोकरशाहीच्या विळख्यातून सुटका होऊन गावे आणि शहरांच्या विकासाचे चक्र सुरू होईल, अशी आशा आहे.

‘घटनेने दिलेल्या मूलभूत अधिकारांचे रक्षण होणे आवश्यक आहे,’ अशी टिप्पणी न्यायालयाने केली असली, तरी या विषयावरील सर्वाधिक कालापव्यय न्यायालयीन प्रक्रियेतच झाला, ही वस्तुस्थिती आहे. करोना साथरोगाच्या काळात या निवडणुका लांबणीवर टाकण्यात आल्या. पाठोपाठ ‘ओबीसी’ आरक्षणाचा पेच उभा राहिला. नागपूर, अकोला, भंडारा आणि वाशीम या जिल्ह्यांमध्ये अनुसूचित जाती-जमाती आणि ‘ओबीसी’ आरक्षणाने घटनेने घालून दिलेली ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडल्यामुळे, ‘ओबीसी’ आरक्षण वगळण्याचा आदेश न्यायालयाने दिला होता. तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने हे आरक्षण कायम ठेवण्याबाबत केलेली याचिकाही फेटाळून, याबाबत शास्त्रशुद्ध माहिती सादर करण्याचा आदेश न्यायालयाने दिला होता.

दरम्यान, राज्य सरकारने याबाबत स्थापन केलेल्या बांठिया आयोगाने याबाबतचा अहवाल सादर केला. मात्र, त्यातून ‘ओबीसीं’च्या सुमारे ३४ हजार जागा कमी होत असल्याचा आक्षेप न्यायालयात घेण्यात आला. आता बांठिया आयोगाच्या शिफारशीपूर्व तरतुदीनुसार, म्हणजेच सन २०२२च्या स्थितीतील २७ टक्के ‘ओबीसी’ आरक्षणासह या निवडणुका घेण्याचा आदेश देण्यात आल्याने सध्या तरी ‘ओबीसीं’चे प्रतिनिधित्व कायम राहणार आहे. केंद्र सरकारने केलेल्या घोषणेनुसार जातनिहाय जनगणना झाल्यानंतर, अनेक राज्यांतील या संदर्भातील प्रश्न सुटू शकतात. मात्र, महाविकास आघाडी सरकारने मुंबईतील प्रभागांची संख्या वाढविण्याच्या विरोधातही एक याचिका सादर झाली होती. पुण्यातही काही गावे महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट झाल्याने, प्रभागांची नव्याने रचना करावी लागणार आहे. ठिकठिकाणची प्रभागरचना, प्रभागांची म्हणजेच सदस्यांची संख्या किती असेल; तसेच ही प्रक्रिया राज्य सरकारच्या अधिपत्याखाली होणार की राज्य निवडणूक आयोगाच्या, या बाबतीतील चित्र स्पष्ट नाही. अपवादात्मक परिस्थितीत वेळ वाढवून मागण्याचाही पर्याय सरकारपुढे खुला आहे.

# आर.पी.हॉस्पिटल येथील डॉक्टरांच्या प्रयत्नाला यश, ९ वर्षांच्या बालकाचे वाचवले प्राण

परभणी (प्रतिनिधी)

खेळताना बॅट लागल्याने डोक्याला गंभीर दुखापत झालेल्या ९ वर्षीय बालकावर परभणी येथील आर.पी. हॉस्पिटल एंड रिसर्च इंस्टिट्यूट येथे यशस्वी मेंदूची शस्त्रक्रिया करून त्याला जीवनदान देण्यात आले. येथील डॉक्टरांनी केलेल्या प्रयत्नाला यश आले आणि बालकाला नवे जीवन मिळाले.

प्राथमिक तपासणीत शल्यचिकित्सक डॉ. आमेर खान यांनी बालकाची पाहणी केली. सिटीस्कॅनच्या अहवालात कवटीच्या हाडाचे तुकडे झाल्याचे निष्पन्न झाले. यामुळे सदरील हाडाचे तुकडे मेंदूवरील आवरणास इजा पोहचवत असल्याचे आढळले आणि हे तुकडे मेंदूला इजा करण्यापूर्वी तात्काळ शस्त्रक्रियेची गरज असल्याचे स्पष्ट झाले. हॉस्पिटलमधील प्रसिद्ध न्यूरो सर्जन डॉ. दत्तात्रय किरडे यांनी बालकाची तपासणी करून तात्काळ शस्त्रक्रिया केली. या अवघड शस्त्रक्रियेत डॉ. आमीर तडवी, डॉ श्रीकांत वांगीकर,डॉ. उर्वशी, डॉ.शिवानी नाईक यांच्यासह संध्या आळने, किशोर नवले आणि पवन लोंढे यांच्या टीमने महत्त्वपूर्ण सहभाग नोंदवला.

बालकाचा मेंदू आता सुरक्षित असून, त्याच्या जीवाचा धोका आता टळलेला आहे, त्याची प्रकृती स्थिर आहे,असे डॉ.किरडे यांनी सांगितले.यावेळी आर.पी.हॉस्पिटलचे प्रमुख आ.डॉ. राहुल पाटील यांनी सांगितले की आर.पी.हॉस्पिटल नेहमीच रुग्णसेवेसाठी कटिबद्ध आहे. या बालकावर यशस्वी शस्त्रक्रिया होणे हे आमच्या वैद्यकीय टीमच्या समर्पण आणि सुसज्ज सुविधांचे यश आहे. रुग्णाला नवजीवन मिळाले याचा आम्हाला अभिमान आहे, असे डॉ. पाटील म्हणाले.

आर.पी.हॉस्पिटलने अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा आणि तज्ज्ञ डॉक्टरांच्या टीमद्वारे परभणीत उच्च दर्जाची आरोग्यसेवा उपलब्ध करून दिली आहे. या बालकावरील यशस्वी शस्त्रक्रिया आमच्या हॉस्पिटलच्या क्षमतेचा पुरावा आहे. आम्ही यापुढेही रुग्णांना सर्वोत्तम उपचार देण्यासाठी कटिबद्ध आहोत, असे आर.पी.हॉस्पिटलचे अधिष्ठाता डॉ.शिंदे यांनी नमूद केले. आमच्या मुलाला नवे आयुष्य देण्यासाठी आम्ही आर.पी. हॉस्पिटलच्या संपूर्ण टीमचे, विशेषतः आमदार डॉ. राहुल पाटील, अधिष्ठाता



डॉ. प्रमोद शिंदे, डॉ.दत्तात्रय किरडे, डॉ. आमीर खान आणि इतर डॉक्टरांचे मनापासून आभार मानतो हॉस्पिटलच्या २४ तास उपलब्ध वैद्यकीय सेवेमुळे आणि तज्ज्ञ डॉक्टरांच्या प्रयत्नांमुळे आमच्या मुलाचे प्राण वाचले, असे नातेवाइकांनी भावूक होत सांगितले.

परभणीत आता अशा शस्त्रक्रियांची सुविधा

ही शस्त्रक्रिया प्रामुख्याने पुणे, मुंबईसारख्या मोठ्या शहरांमध्येच होत असे. परंतु, आता परभणी येथील आर पी हॉस्पिटलच्या सुसज्ज सुविधा आणि तज्ज्ञ वैद्यकीय टीममुळे अशा अवघड शस्त्रक्रिया येथेही यशस्वीपणे होऊ शकतात. यामुळे परभणी आणि आजूबाजूच्या परिसरातील रुग्णांना मोठ्या शहरांमध्ये जाण्याची गरज भासणार नाही. आर पी हॉस्पिटलच्या या यशामुळे अनेकांना नवजीवन मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# पाथरी येथे उभारणार महात्मा जोतिराव फुले व सावित्रीबाई फुले यांचे भव्य स्मारक

## जिल्हाधिकारी यांनी दिले आदेश

परभणी (प्रतिनिधी)

पाथरी नगरपरिषद अंतर्गत माळीवाडा परिसरात क्रांतीसूर्य जोतिराव फुले व क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांचे भव्य स्मारक उभारण्यासाठी तसेच पाथरी , सोनपेठ, व मानवत येथील विविध विकासकामांसाठी जमिनीचे अधिग्रहण, मूल्यांकन तसेच नियामक आयोगाकडे प्रस्ताव पाठवण्याबाबत आ राजेश विटेकर यांनी जिल्हाधिकारी परभणी येथे आयोजित केलेल्या बैठकीत जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना त्याबाबत आदेश दिले आहेत

पाथरी येथील माळीवाडा परिसरात क्रांतीसूर्य जोतिराव फुले व सावित्रीबाई फुले यांच्या भव्य स्मारक व सुशोभिकरासाठी ती जागा प्रस्तावित करण्यात आली आहे , सर्व प्रक्रिया पार पडल्यानंतर स्मारक उभारण्यासाठी सुरुवात होईल , याच ठिकाणी बहुउद्देशीय सामाजिक उभारण्यात येणार आहे, तर सोनपेठ येथे जायकवाडी वसाहत परिसरात भव्य

क्रिडांगण उभारण्यात येणार आहे त्यासाठी सोनपेठ नगरपरिषदेने ३८ कोटी रुपयांची रक्कम जायकवाडी पाटबंधारे विभागाकडे जमा केली असून मंजुरीचा प्रस्ताव नियामक आयोगाकडे सादर करण्यात आला आहे अशी माहिती सोनपेठ येथील तहसीलदार काव्रखें यांनी बैठकीत दिली तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकिय मुलां-मुलींचे वसतिगृह उभारण्यासाठी



शेळगाव किंवा दिघोळ येथील जमीन पाहण्यात येणार आहे जर जमीन मिळत नसेल तर आ राजेश विटेकर यांनी स्वतःच्या खर्चाने जमीन विकत घेऊन वस्तीगृहासाठी जमीन देणार असल्याचे या बैठकीत जिल्हाधिकारी यांना सांगितले तर पाथरी

येथे मोठे क्रिडांगण , डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकिय मुलां-मुलींचे वस्तीगृह, नवीन प्रशासकीय इमारत तसेच भक्त निवास साठी पोहेटाकळी शिवारातील गट क्र.८३ मधील १७ एकर जमीन निश्चित करण्याचे यावेळी ठरले असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी व तहसीलदार हांडेश्वर यांनी बैठकीत दिली, त्याची पाहणी, मोजणी व मूल्यांकन काढण्याबाबत कार्यकारी अभियंता पाटबंधारे प्रसाद लांब, मुद्रांक जिल्हाधिकारी , तसेच जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांना जिल्हाधिकारी यांनी आदेश दिले सदरील प्रस्ताव तयार झाल्यावर नियामक आयोगाकडे सादर करण्यात येणार आहे, सोबतच पाथरी येथील नवीन उप विभागीय अधिकारी कार्यालय व निवासस्थान बांधकाम करण्या साठी पाथरी येथील गट क्र. ०८ मधील १ हेक्टर जागा यांची निश्चितता करण्यात आली परंतु त्याचे मूल्यांकन जास्तीचे आलेले असल्याने त्याचे फेर मूल्यांकन करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी यावेळी दिल्या , मानवत येथे भव्य क्रिडांगण उभारण्यासाठी मानवत नगरपरिषदेने पुरेसा निधी उपलब्ध करून देण्याची तयारी केलेली आहे ते लक्षात घेऊन रत्नापूर शिवारातील गट क्र. ३ व ५ मधील १३ एकर जागेची मोजणी व मूल्यांकन करण्याबाबतच्या सूचना तहसीलदार पांडुरंग माचे वाढ , मुख्याधिकारी कोमल सावरे यांना जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी दिल्या आहेत.

जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी वरील सर्व जमिनी विकासकामांसाठी हस्तांतरित करण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला असून पुढील आठवड्यात त्याबाबत मंत्री महोदय सोबत बैठक आयोजित करण्यात आली असल्याची माहिती आ राजेश विटेकर यांनी बैठकीत दिली, त्यापूर्वी हे प्रस्ताव मंत्रालय स्तरावर सादर करण्यात येणार आहेत, या बैठकीस आ राजेश विटेकर, डॉ अंकुश लाड, पंकज आंबेगावकर, रामभाऊ अरगडे , यांच्या सह जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, दिपा गुट्टे सामाजिक न्याय विभागाचे सहाय्यक आयुक्त, सार्वजनिक बांधकाम विभागाने कार्यकारी अभियंता पाटील, जायकवाडी पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता प्रसाद लांब, जिल्हा प्रशासन अधिकारी प्रदीप जगताप, तहसीलदार सर्वश्री कावरखे,माचेवाढ, हांडेश्वर, मुख्याधिकारी कोमल सावरे, पिंपळकर जिल्हा भूमिलेख अधिकारी , सहाय्यक निबंधक, मोजणी अधिकारी जायकवाडी पाटबंधारे विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता असे जवळपास ३५ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# विभागीय रेल्वे व्यवस्थापकांद्वारे परभणी रेल्वे स्थानकाची पाहणी

## नांदेड - परळी मार्गाची केली तपासणी : विविध पायाभूत सुविधांचा घेतला आढावा

परभणी (प्रतिनिधी)

दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक प्रदीप कामले यांनी शुक्रवारी (दि. ९) नांदेड विभागातील नांदेड ते परळी रेल्वेमार्गांवर तपासणी दौरा केला. या दौर्यात विविध पायाभूत सुविधांचा आढावा घेऊन भविष्यातील सुरक्षा व कार्यक्षमतेच्या दृष्टीने सूचना देण्यात आल्या. नांदेड ते परळी दरम्यान रेल्वेमार्गावर तपासणी खिडकीतून सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक अशा विविध संरचना, वळणे, ब्रिजेस व सिग्नल यांची बारकाईने पाहणी करण्यात आली.

परभणी, गंगाखेड रेल्वे स्थानकांचा विकास अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत करण्यात येत असुन याविषयी पुनर्विकास कार्याचा आढावा



घेण्यात आला. परळी ते वडगाव निळा स्थानकांदरम्यान लेव्हल क्रॉसिंग गेट क्र. २४-, गंगाखेड - पोखरणी नृसिंह स्थानकांदरम्यान पूल क्र. २८, वडगाव निळा - गंगाखेड जवळील वळण क्र. १७ आणि गंगाखेड स्टेशनयार्ड संरचनांची तपासणी करून देखभाली संदर्भात सुचना देण्यात आल्या. तसेच गंगाखेड रेल्वे स्टेशन येथील रिले रूम आणि स्टेशन विकास कार्याची पाहणी केली. वडगाव निळा रेल्वे स्थानकाची तपासणी केली. यानंतर परभणी रेल्वे स्थानकाची तपासणी केली. येथे स्टेशन मास्तर कार्यालयाची तपासणी करून प्रीमियम पार्किंग, स्टेशन विकास कार्य, प्रवासी सुविधांची विभागीय व्यवस्थापक प्रदीप कामले यांनी पाहणी केली.

यावेळी पी. सी. रुद्रमूर्ति वरिष्ठ विभागीय अभियंता,पी. सुरेश वरिष्ठ विभागीय सिग्नल आणि टेलिकॉम अभियंता, निमजे, उप मुख्य अभियंता, गतीशक्ती नांदेड, ए. रवी तेजा वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, शसोभन बाबू विभागीय विद्युत अभियंता/टीआरडी, श्रीनिवास सूर्यवंशी, सहायक वाणिज्य अधिकारी, गिरीश कुमार, सहायक सिग्नल आणि टेलिकॉम अभियंता आदींची उपस्थिती होती.

# दोऱ्याच्या फाशात अडकलेल्या जांभळी पाणकोंबडीची सुटका

जिंतुर (प्रतिनिधी)

उलट्या नदी शेजारी असलेल्या सटवाई माता मंदिराच्या च्या पाठीमागे शेतात दोऱ्याच्या विळख्यात अडकून पडलेली जांभळी पाणकोंबडी काही स्थानिक मुलांना दिसून आली. त्यांनी पक्षीमित्र अनिल उरटवाड यांना संपर्क करून दोऱ्यात अडकून असलेल्या पक्ष्याविषयी माहिती सांगितली. पक्षीमित्राने तत्परता दाखवत लगेच त्या ठिकाणी पोहोचून जांभळी पाणकोंबडी ची सुटका केली. जिंतूर पासून जवळच पक्षांचे नंदनवन असलेल्या निवळी खुर्द गावच्या जलाशयात पक्षीमित्र अनिल उरटवाड त्यांचे सहकारी मोहन खिल्लारे, सुमित घनसावंत यांच्या मदतीने जलाशयाजवळ असलेल्या मूळ अधिवासात सोडून देण्यात आले.



इंग्रजीमध्ये या पक्षाचे नाव ग्रे हेडेड स्वामपहेन, शास्त्री नाव पॉफ्रीरिओ पॉफ्रीरिओ असे आहे. पक्षी निरीक्षकांमध्ये या पक्षाला लिपस्टिक बर्ड असे टोपणनाव आहे. चोचीला रंगवल्यासारख्या दिसणाऱ्या लाल भडक रंगामुळे हे नाव पडलेले आहे. एकदा पाहिल्यानंतर लक्षात राहणारा आणि दुसऱ्यांदा दिसला तर सहज ओळखू येणारा हा पक्षी नदी, दलदली, तलावावर कोंबडी सारखा चरतांना दिसतो. संपूर्ण भारतात सहज दिसणारा स्थानिक पक्षी आहे. चालत चालत शेपटीला झटके द्यायची त्याची अनोखी सवय पक्षी निरीक्षकास भूरळ घालते. प्रामुख्याने पाणवनस्पतीवर आपली स्वतःची उपजीविका भगवणारा पक्षी आहे. तसेच धान्य किडे आणि मृदुशरीरी प्राण्यांचा तिच्या आहारात समावेश असतो. एप्रिल ते ऑक्टोंबर हा जांभळी पाणकोंबडीचा विनीचा हंगाम असतो. नर- मादी पिल्लांच्या आणि एकमेकांच्या संपर्कात राहण्यासाठी चक - चक - चक - चक! असा आवाज काढतात.



# आमदार गुट्टे यांनी श्री गुप्तेश्वर मंदिर जीर्णोद्धार कामाची केली पाहणी

गंगाखेड (प्रतिनिधी)

आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे यांनी तालुक्यातील मौजे धारासुर येथील श्री गुप्तेश्वर मंदिर जीर्णोद्धार कामाची पाहणी करून सविस्तर आढावा घेतला. कामात वापरले जाणारे साहित्य, मनुष्यबळ, कालमर्यादा, निधीची उपलब्धता आणि संभाव्य धोरण याबाबत संबंधित विकासक आणि अधिकार्यांशी संवाद साधला. शिवाय, मंदिर जीर्णोद्धार कामात काही अडचण आल्यास किंवा प्रशासकीय समस्या उपलब्ध झाल्यास तातडीने संपर्क करा. मात्र, काम लवकर पूर्ण करा, अश्या स्पष्ट सूचना त्यांनी केल्या.

गोदावरी नदी काठावर असलेल्या प्राचीन कालीन श्री गुप्तेश्वर मंदिराची अवस्था अत्यंत दयनीय झाल्याने प्राचीन कालीन या मंदिराचे जतन व संवर्धन करण्याच्या मागणी संदर्भात येथील ग्रामस्थांनी राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाकडे रेटा लावल्याने मंदिराच्या जिर्णोद्धारासाठी २८ कोटी ५८ लाख रुपये निधी उपलब्ध करून देत पहिल्या टप्प्यात १४ कोटी ७९ लाख ९५ हजार रुपयास वित्तीय मान्यता देऊन धारासुर येथील या प्राचीन कालीन श्री गुप्तेश्वर मंदिराचे जतन व संवर्धन करण्यासाठी मंदिर जिर्णोद्धाराचे काम पर्यटन व सांस्कृतिक कार्य संचालनालय यांच्या वतीने सुरू करण्यात आले आहे. श्री गुप्तेश्वर मंदिर जतन व सवर्धन जिर्णोद्धाराचे काम करताना कोरीव दगड व शिळा तसेच कळस उतरविण्याचे काम पूर्ण झाले आहे. तसेच पुरातत्त्व विभागाच्या सुचनेप्रमाणे मंदिराचे शिखर उतरवून सभा मंडप, अंतराळ गर्भ ग्रहासह संपूर्ण मंदिर उतरविण्यात आले आहे. त्यामुळे आता नव्याने काम सुरू झाले आहे. काम प्रगतीपथावर असून थोडा वेग वाढवणे गरजेचे असल्याचे स्थानिक नागरिकांकडून सांगितले जात आहे. दरम्यान, यावेळी पुरातत्त्व विभागाचे सर्व कर्मचारी, संबंधित आर्किटेक, इंजिनियर्स, कामाचे कॉन्ट्रॅक्टर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दर्जेदार व गुणवत्तापूर्ण काम वेळेत पूर्ण करा...

परभणी जिल्ह्यातील हजारो भक्तांचे श्रद्धास्थान असलेले हे श्री गुप्तेश्वर मंदिर आहे. त्यामुळे स्थानिक रहिवासी आणि भक्तांच्या भावनांचा सकारात्मक विचार करून काम वेळेत पूर्ण करण्यासाठी उपाययोजना करा. तसेच कामात कुठलीही हयगय करू नका. लागणारे साहित्य उत्कृष्ट पध्दतीचे वापरा. मंदिराच्या भविष्याचा विचार करून कामाचे धोरण प्रभावीपणे वापरा. तसेच शासनाने घालून दिलेली कालमर्यादा लक्षात ठेऊन दर्जेदार व गुणवत्तापूर्ण काम वेळेत पूर्ण करा, अशा सूचना स्थानिक आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे यांनी दिल्या.

# धाडसी चोरीने जिंतूर हादरलं,३ दुकाने फोडली; वजनदार साहित्य चारचाकी वाहनातून लंपास

जिंतूर । प्रतिनिधी

जिंतूर शहरातील परभणी रोडवरील मुख्य व्यापारी परिसरात शुक्रवारी ९ मे रोजी मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी तीन दुकाने फोडून सुमारे ०६ लाख रुपयांच्या रोख रकमेसह वजनदार साहित्य आणि मौल्यवान वस्तू चोरी केल्या. ही घटना शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी घडल्याने व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

शहरातील परभणी रोड हे नेहमी नागरिकांनी गजबजलेला परिसर असतांनी ही मध्यरात्रीच्या काळोख्याचा फायदा उचलत अज्ञात चोरत्यानी अतिशय धंदासीपणाने एकाच रात्री परिसरातील तब्बल तीन दुकाने फोडली. दुकानातील रोख रक्कम, संसारोपयोगी साहित्य व इतर वजनदार माल चारचाकी वाहनात भरून नेला. शहराच्या मुख्य रस्त्यावरच चोरी झाल्याने व्यापाऱ्यांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. चोरट्यांनी रात्रीच्या वेळेस अगदी योजनाबद्ध पद्धतीने शटर उचकटून दुकानांमध्ये प्रवेश केला. यावेळी त्यांनी मौल्यवान वस्तू, इलेक्ट्रॉनिक साहित्य, व रोख रक्कम असा एकूण सुमारे ०६ लाखांचा ऐवज चोरून नेल्याची माहिती समोर आली आहे. चोरीस गेलेला माल चारचाकी वाहनात भरून नेण्यात आल्यामुळे चोरट्यांनी पूर्वनियोजितरीत्या ही कारवाई केल्याचे स्पष्ट झाले आहे. चोरी करण्यात आलेल्या प्रतिष्ठानमध्ये जे के मोटार गॅरेज, विठ्ठल ॲग्रो, प्रधान फर्निचर यांचा



समावेश आहे.घटनेची माहिती मिळताच सपोनि जाधव, बीट जमादार पठाण, लहाने हे तातडीने घटनास्थळी दाखल झाले असून, परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे चोरत्यानी फोडून टाकल्याने पोलिसांना पोलिसांना चोरट्यांचा सुगावा लावण्यासाठी त्यांच्यासमोर मोठे आव्हान उभे टाकणार आहे. दरम्यान, या घटनेमुळे स्थानिक व्यापाऱ्यांत संतापाची लाट उसळली असून, त्यांनी शहरात रात्रगस्त वाढवण्याची आणि सुरक्षा यंत्रणा अधिक सक्षम करण्याची मागणी पोलीस प्रशासनाकडे केली आहे.

# स्वामी समर्थ मंदिरातील रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

परभणी (प्रतिनिधी)

परमपूज्य मोरेदादा यांच्या संकल्पनेतून तसेच देश संरक्षणासाठी लढणार्या जवानांसाठी सिंचन नगरातील स्वामी समर्थ मंदिर येथील विश्वस्त मंडळाद्वारे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात मोठा प्रतिसाद मिळाला.

या केंद्रमार्फत वर्षातून अनेक उपक्रम राबविण्यात येतात. त्यामध्ये प्रामुख्याने स्वच्छता अभियानला जास्त महत्त्व आहे. रक्तदान शिबिरास परभणीच्या विविध भागातून पुरुष, महिला, तसेच सेवेकरी यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी डॉ. पोले, डॉ. कालिदास चौधरी, डॉ. लखमावार, डॉ.



भाग्यश्री मुंडे, दत्तात्रय देठणकर (दाजी), बाळासाहेब चौधरी, सुशील भैया देशमुख, श्याम आंबेकर, विजयकुमार काजबवार, चंदन सिंह परिहार, विठ्ठल भुसेवाड, प्रवीण कराळे, दत्ता बागल, राजेश कंठाळे, नरेश येरळकर, तसेच साक्षी राजेंद्र भताने यांनी प्रयत्न केले.

# नंदू जमदाडे मृत्यू प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी

परभणी (प्रतिनिधी)

नरळद येथे भीम जयंतीच्या दिवशी पोलिसांकडून झालेल्या मारहाणीत नंदु सुदामराव जमदाडे यांचा मृत्यु झाला. या प्रकरणाची सखोल चौकशी करावी या मागणीसाठी जमदाडे कुटुंबियांनी मानवत पोलीस ठाण्यासमोर आक्रोश व्यक्त केला.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते रामेश्वर बचाटे, सामाजिक कार्यकर्ते संजय सोनकांबळे, संजय जमदाडे, दिव्या जमदाडे (मयताची पत्नी), कारभारी पवळे, रमेश पाईकराव, विलास जमदाडे, प्रभाकर जमदाडे, सुरेश पंडित, बाळू पंडित, विद्याधर गायकवाड, दीपक पाईकराव, करण कांबळे, भास्कर जमदाडे,




आकाश जमदाडे, बाबासाहेब आव्हाड, गणपत पवळे, नामदेव उपाडे, ॲड. पोटभरे, एकनाथ पंडित गालफाडे, संतोष इंगोले, स्वप्नील ब्रह्मराक्ष, सुनिता कांबळे, कविता पाईकराव, कोमल जमदाडे, गयाबाई जमदाडे आदीसह महिला उपस्थित हो

# बदनापूर कृषि संशोधन केंद्र सर्वोत्तम केंद्र पुरस्काराने सन्मानित

## कुलगुरू डॉ. इंद्र मणि यांनी केले शास्त्रज्ञांचे अभिनंदन

परभणी/प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या बदनापूर येथील कृषि संशोधन केंद्रास अखिल भारतीय समन्वित संशोधन प्रकल्प - खरिप कडधान्य अंतर्गत सर्वोत्तम केंद्र पुरस्कार सन्मान प्राप्त झाला आहे. या पुरस्काराबद्दल कुलगुरू डॉ. इंद्र मणि यांनी केंद्राच्या सर्व शास्त्रज्ञांचे अभिनंदन केले आहे.

पुरस्काराची घोषणा ७ ते ९ मे दरम्यान जयपूर येथे झालेल्या वार्षिक गट बैठकीत करण्यात




आली. राष्ट्रीय पातळीवर हा भव्य सन्मान समजला जातो. बदनापूर कृषी संशोधन केंद्रास बुधवार (दि. ७)रोजी भारतीय कृषि संशोधन परिषदेचे महासंचालक डॉ. मांगीलाल जाट यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी पिक विज्ञानचे सह महासंचालक डॉ. डी. के. यादव, कडधान्येचे सहायक महासंचालक डॉ. संजीव गुप्ता, कडधान्येचे संचालक डॉ. जी. पी. दीक्षित, अखिल भारतीय समन्वित संशोधन प्रकल्प - खरिप कडधान्येचे प्रकल्प समन्वयक डॉ. आदित्य प्रताप आदी उपस्थित होते.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इन्द्र मणि यांच्या नेतृत्वात विद्यापीठ नवीन संशोधन व शेतकरी-केंद्रित तंत्रज्ञान विस्तार या दिशेने प्रगती करत असून, मराठवाडा विभागात शेतीविकासासाठी सातत्याने कार्यरत आहे. बदनापूर केंद्राने खरीप हंगामातील तूर, मुग, उडीद, हरभरा यासारख्या कडधान्य पिकांवर केलेले उत्कृष्ट संशोधन, नवीन वाणांचा विकास, प्री - ब्रीडिंग संशोधन, आणि शाश्वत शेतीसाठी उपयुक्त उत्पादन व संरक्षण तंत्रज्ञान याविषयी संशोधन केले आहे.

या यशाबद्दल कुलगुरू डॉ. इन्द्र मणि, संशोधन संचालक डॉ. खिजर बेग, शिक्षण संचालक डॉ. भगवान आसेवार, विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे, विद्यापीठातील सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख आणि कर्मचाऱ्यांनी संशोधन केंद्रातील शास्त्रज्ञांचे अभिनंदन केले आहे.

# हिंदू-मुस्लिमांचं श्रध्दास्थान हजरत मौलाली बाबांचा यात्रोत्सव

कडा (प्रतिनिधी)

कडा येथील ग्रामदैवत तथा सर्वधर्मियांचं श्रध्दास्थान म्हणून नावलौकिक असलेल्या हजरत मौलाली बाबांचा यात्रोत्सव मंगळवार ६ मे पासून सुरू झाला असून सोमवारी दि.१२ मे रोजी मोठ्या उत्साहात यात्रा-उरूस संपन्न होणार आहे.आष्टी तालुक्यातील कडा हिंदू -मुस्लिम एकोपा जोपासणारं गाव म्हणून मराठवाड्यात नावलौकिक आहे. याठिकाणचा यात्रोत्सव सामाजिक एकतेचे प्रतीक मानला जातो.

कडीनदीच्या किनारी ग्रामदैवत तथा सर्वधर्मियांचं श्रद्धास्थान हजरत मौलाली बाबांची दर्गाह आहे.दरवर्षी सर्वधर्मिय ग्रामस्थ एकत्रितपणे खेळीमेळीच्या वातावरणात हा उत्सव साजरा करतात. व्यवसाय,नोकरीनिमित्त बाहेरगावी गेलेले नागरिक बाबांच्या यात्रेच्या निमित्ताने आवर्जून हजेरी लावतात.बुध्द पौर्णिमेला यात्रेला सुरूवात होते.पौर्णिमेच्या



अगोदर येणा-या बुधवारी हजरत मौलाली बाबांना संदल लावतात.यावर्षी सोमवारी दि.१२ मे रोजी यात्रा-उरूस असून सर्व ग्रामस्थ एकत्रित येऊन बाबांची सवाद्य छबीना मिरवणूक काढतात.बाबांच्या समाधीला फुलांची चादर अर्पण करून श्रीफळ, मलिदा ,गुळ-खोब-याच्या शेरणीचा प्रसाद दाखवून भाविक-भक्त आपली इच्छापुर्ती करतात.त्याच दिवशी पहाटेच्या दरम्यान शोभेच्या रंगीत फटाक्यांची आतिषबाजी लक्षवेधी असते.हा नेत्रदीपक सोहळा पाहण्यासाठी महिला,पूरूष, बालगोपाळ देखील सहभागी होतात.तर दुस-या दिवशी नामवंत मल्लांच्या कुस्तीची दंगल आयोजित करण्यात येते.नदीकाठी थाटलेल्या विविध दुकानांना विद्युत रोषणाईने सजविण्यात येते.यात्रेत आलेली मनोरंजनाची साधने यात्रेकरूंची लक्षवेधुन घेतात.कडयाची यात्रा म्हणजे हिंदू -मुस्लिम बांधवांच्या एकतेचं प्रतीक मानली जाते, यातूनच सामाजिक एकोप्याचे दर्शन अनुभवायला मिळते.हा यात्रोत्सव शांततेत साजरा करण्यासाठी सरपंच,उपसरपंच, ग्रा.प.सदस्य, यात्रा कमिटी,ग्रामस्थ,दर्गा चे आर्चक,पोलिस प्रशासन, एकत्रितपणे परिश्रम घेताना पहायला मिळतात.हेच हजरत मौलाली बाबांच्या यात्रेचं वैशिष्ट्य मानलं जातं.

# ठिबक, तुषार असोसिएशन नांदेड जिल्हा अध्यक्ष पदी साईनाथ पाटील जाधव रोशनगावकर यांची निवड

धर्माबाद ( अशोक पडोळे )

धर्माबाद - नांदेड येथे काल रोजी दिनांक ०८/०५/२५ नांदेड येथे झालेल्या बैठकीमध्ये जिल्हा अध्यक्ष पदासाठी साईनाथ पाटील जाधव रोशनगावकर आणि जिल्हा उपाध्यक्ष म्हणून संदीप देशमुख कामनगांवकर व सचिव म्हणून बळवंत पाटील गाडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.यावेळी उपस्थित मान्यवर ज्येष्ठ वितरक सुपारे साहेब, शिंदे पाटील तळेगावकर,बोधने पाटील नरसीकर, मोहन पाटील जाधव मुखेडकर,गजु पाटील अर्धापूरकर, साईनाथ कदम चोळाखेकर, एम डी पवार निवघेकर,पंढरी शिंदे रावधानोरकर, संजय पाटील घोणसे, गजानन कुंटेवाड आलुर धर्माबाद इत्यादी यांची उपस्थिती होती.

गेल्या दोन वर्षांपासून ठिबक, तुषार अनुदान वेळेवर न मिळाल्याने शेतकरी हतबल झाले आहेत त्यामुळे शासनाकडे पाठपुरावा करण्यासाठी डिलर असोसिएशन गरजेचे होते, बर्याच दिवसांपासून नांदेड जिल्हा असोसिएशन समिती स्थापन करण्याची चर्चा सुरू होती,



मारोती पवार निवघेकर यांनी साईनाथ पाटील जाधव रोशनगावकर यांचे नाव सुचविले होते खुप लोकांनी पाठिंबा दाखवला होता तेव्हा धर्माबाद येथील प्रतिष्ठित व्यापारी साईनाथ पाटील कदम चोळाखेकर यांनी डिलर मिटिंग आयोजित केली व सर्व डिलर्सना एकत्र करून हा निर्णय घेण्यात आला

जिल्हा अध्यक्ष पदासाठी निवड झाल्यानंतर साईनाथ पाटील जाधव यांनी सर्व डिलर्सचे आभार मानले व हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व वितरक आणि साईनाथ कदम चोळाखेकर व मारोती पवार निवघेकर यांनी परिश्रम घेतले .



# परभणी रेल्वे स्थानकावर प्रवाशांना सुविधा उपलब्ध करून द्या

## मराठवाडा रेल्वे प्रवासी महासंघाची मागणी : विभागीय व्यवस्थापकांना निवेदन

परभणी (प्रतिनिधी)

परभणी रेल्वेस्थानकावर प्रवाशांना सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात, अशी मागणी मराठवाडा रेल्वे प्रवासी महासंघाने दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड येथील विभागीय व्यवस्थापकांकडे केली आहे. दक्षिण मध्य रेल्वेचे व्यवस्थापक प्रदीप कामले व त्यांची टीम मराठवाड्यातील परळी, गंगाखेड आणि परभणी या स्थानकाची तपासणी करण्यासाठी आले होते. परभणी रेल्वे स्थानकावर त्यांचे आगमन होताच मराठवाडा रेल्वे प्रवासी महासंघाचे अरुण मेघराज, प्राचार्य सुरेश नाईकवाडे, रुस्तुम कदम, कदिर लाला हाश्मी, माणिक शिंदे बलसेकर, विठ्ठल काळे आदींनी त्यांची भेट घेऊन परभणी स्थानकावरील विविध समस्या त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या. त्यात अमृत रेल्वे स्थानक योजनेअंतर्गत परभणी स्थानकाचे पुनर्निर्माणधीन काम खूप संथ गतीने सुरू आहे त्याबद्दल नाराजी व्यक्त करून हे काम द्रुतगतीने सुरू करावे, परभणी स्थानकावर नवीन पादचारी पुलावर लिफ्टचे काम पूर्ण होऊन चार महिने झाले तरी अद्यापही ती लिफ्ट सुरू करण्यात आली नाही ती त्वरित सुरू करावे, नवीन पादचारी



पुलाला स्थानका बाहेरचा रस्ता बंद केला आहे तो खुला करावा, जनशताब्दी एक्सप्रेस ला परभणी स्थानकावर सकाळी साडेसहाच्या दरम्यान काउंटर तिकीट उपलब्ध करून द्यावे, परभणी स्थानकावर सध्या मोबाईल व सामान चोरीच्या घटनात वाढ झाली आहे त्यामुळे पुरेसा पोलीस बंदोबस्त द्यावा, स्थानकावर भिकार्यांचा बंदोबस्त करावा, तसेच प्राईम पार्किंग मध्ये प्रवाशांची होणारी लूट थाबंवावी अशा विविध मागण्या यावेळी करण्यात आल्या.दरम्यान, या सर्व मागण्यावर आपण विचार करून तत्काळ निर्णय घेऊ असे आश्वासन यावेळी व्यवस्थापक प्रदीप कामले यांनी मराठवाडा मराठवाडा रेल्वे प्रवासी महासंघाच्या शिष्टमंडळास दिले. यावेळी स्टेशन मास्तर अरविंद इंगोले, दमरे कार्यालयातील अधिकारी सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

# परभणी रेल्वे स्थानकावर प्रवाशांना सुविधा उपलब्ध करून द्या

## मराठवाडा रेल्वे प्रवासी महासंघाची मागणी : विभागीय व्यवस्थापकांना निवेदन

परभणी (प्रतिनिधी)

परभणी रेल्वेस्थानकावर प्रवाशांना सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात, अशी मागणी मराठवाडा रेल्वे प्रवासी महासंघाने दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड येथील विभागीय व्यवस्थापकांकडे केली आहे. दक्षिण मध्य रेल्वेचे व्यवस्थापक प्रदीप कामले व त्यांची टीम मराठवाड्यातील परळी, गंगाखेड आणि परभणी या स्थानकाची तपासणी करण्यासाठी आले होते. परभणी रेल्वे स्थानकावर त्यांचे आगमन होताच मराठवाडा रेल्वे प्रवासी महासंघाचे अरुण मेघराज, प्राचार्य सुरेश नाईकवाडे, रुस्तुम कदम, कदिर लाला हाश्मी, माणिक शिंदे बलसेकर, विठ्ठल काळे आदींनी त्यांची भेट घेऊन परभणी स्थानकावरील विविध समस्या त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या. त्यात अमृत रेल्वे स्थानक योजनेअंतर्गत परभणी स्थानकाचे पुनर्निर्माणधीन काम खूप संथ गतीने सुरू आहे त्याबद्दल नाराजी व्यक्त करून हे काम द्रुतगतीने सुरू करावे, परभणी स्थानकावर नवीन पादचारी पुलावर लिफ्टचे काम पूर्ण होऊन चार महिने झाले तरी अद्यापही ती लिफ्ट सुरू करण्यात आली नाही ती त्वरित सुरू करावे, नवीन पादचारी पुलाला स्थानका बाहेरचा रस्ता बंद केला आहे तो खुला करावा, जनशताब्दी एक्सप्रेस ला परभणी स्थानकावर सकाळी साडेसहाच्या दरम्यान काउंटर तिकीट उपलब्ध करून द्यावे, परभणी स्थानकावर सध्या मोबाईल व सामान चोरीच्या घटनात वाढ झाली आहे त्यामुळे पुरेसा पोलीस बंदोबस्त द्यावा, स्थानकावर भिकार्यांचा बंदोबस्त करावा, तसेच प्राईम पार्किंग मध्ये प्रवाशांची होणारी लूट थाबंवावी अशा विविध मागण्या यावेळी करण्यात आल्या.

दरम्यान, या सर्व मागण्यावर आपण विचार करून तत्काळ निर्णय घेऊ असे आश्वासन यावेळी व्यवस्थापक प्रदीप कामले यांनी मराठवाडा मराठवाडा रेल्वे प्रवासी महासंघाच्या शिष्टमंडळास दिले. यावेळी स्टेशन मास्तर अरविंद इंगोले, दमरे कार्यालयातील अधिकारी सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

# परभणी शहरात युवकाचा खून, ४ जणांवर गुन्हा दाखल



परभणी (प्रतिनिधी)

जिंतूर रोडवरील बाळासाहेब ठाकरे कमानी जवळ शुक्रवार दि. ९ मे रोजी रात्रीच्या सुमारास विशाल आर्वीकर या युवकांवर जणांनी धारदार शस्त्राने वार करुन खुन केल्या प्रकरणी चार जणांवर नानलपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शुक्रवार दि. ९ मे च्या रात्री साडे नऊच्या दरम्यान विशाल आर्वीकर व आर्वी गावातील विलास गणेशराव कदम हे ठाकरे कमानीजवळ भेटले. व हनुमान मंदिराच्या पाठीमागील रोडवर बोलत उभे असताना, ठाकरे कमानीकडून दोन मोटारसायकलवर चार इसम तेथे आले. त्यांच्या तोंडाला रुमाल बांधलेले होते. त्यातील तिघांच्या हातात धारदार शस्त्र होते. व एकाच्या हातात हातोडा होता. त्यातील एकाने विशालच्या पाठीमागुन धारदार शस्त्राने हल्ला केला. त्यावेळी विशालने पाठीमागे वळून पाहिले असता, त्या चौघांनी विशालला हातातील धारदार शस्त्र व हातोड्याने मारहाण करण्यास सुरुवात केली. विलास कदम हा भांडण सोडविण्यास गेला असता, त्यातील एकाने त्याच्या हातातील धारदार शस्त्र त्याला दाखवून लांब थांबण्यास सांगितले. दरम्यान त्या चौघांनी विशाल यास धारदार शस्त्र व हातोड्याने मारल्याने विशाल हा जमीनीवर पडला. त्यानंतर ते चौघे परत मोटारसायकलने पसार झाले. विशाल यास जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून मयत घोषीत केले. या प्रकरणी वर्षा श्रीधर गिराम यांच्या फिर्यादीवरुन विक्की पाष्टे, गोविंद उर्फ गोपाल पाष्टे, शुभम पाष्टे, तुषार सावंत यांच्यावर नानलपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## शांतता पाळा, अफवांवर विश्वास ठेवू नका

# आडसकर चषक राज्य स्तरीय क्रिकेट स्पर्धेचे शानदार उद्घाटन संपन्न

## राजमुद्रा ग्रुपचा अनोखा उपक्रम केजमध्ये पहिल्यांदाच भरवल्या राज्यस्तरीय डे-नाईट क्रिकेट स्पर्धा



**प्रतिनिधी @ केज**

केज तालुक्यातील युवा प्रतिभेला व्यासपीठ मिळावे आणि ग्रामीण खेळाडूंना राज्य पातळी वर चमकण्याची संधी मिळावी या उदात्त हेतूने राजमुद्रा ग्रुप,केजयांच्या वतीने 'आडसकरचषक राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धा' आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचे उद्घाटन नुकतेच मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडले.उद्घाटन समारंभात कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून गेवराई विधान सभेचे आमदार विजयसिंहराजे पंडित हे होते,तर प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते रमेशराव आडसकर तसेच अन्य प्रमुख पाहुण्यांनीही उपस्थिती लावली.स्पर्धेत महाराष्ट्रा तील विविध जिल्ह्यां मधून एकूण ३७ संघ सहभागी झाले असून, ही स्पर्धा ७ दिवस चालणार आहे. सामन्यांसाठी अत्याधुनिक व्यवस्था, अंपायर्सची योग्य निवड आणि प्रेक्षकांसाठी उत्तम सुविधा करण्यात आल्या आहेत. आडसकर चषक विजेत्या संघासाठी रोख पारितोषिक २ लाख ९२१ रुपये,उप विजेत्या संघाला १ लाख ९२१ रुपये तर तृतीय संघास ५० हजार ९२१ रुपये व चौथ्या स्थानी येणाऱ्या संघास ३० हजार ९२१ रुपये,तर पाचव्यास्थानी येणाऱ्या संघास प्रत्येकी २९ हजार ९२१ रुपये तसेच सन्मानचिन्ह आणि ट्रॉफीचे वितरण केले जाणार आहे. या उपक्रमामुळे राज्यभरा तील युवा खेळाडूंमध्ये नवीन ऊर्जा आणि प्रेरणा निर्माण झाली आहे.या स्पर्धेच्या आयोजनाबद्दलराजमुद्रा ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष सर्वेसर्वा अमर पाटील याचे सर्वत्र कौतुक होत असून,केज तालुक्याला खेळाच्या क्षेत्रात वेगळी ओळख मिळवून देण्याचा संकल्प आयोजकांनी केला आहे.



## जिवाचीवाडी येथील साठवण तलावातील अनधिकृत पाणी उपसा बंद करणे संदर्भात अप्पर जिल्हाधिकारी यांना पत्रक सादर

### साठवण तलावातील अवैध पाणी उपसा तात्काळ बंद करा- सुभाष सारुक

**प्रतिनिधी @ केज**

केज तालुक्यातील जिवाचीवाडी येथील साठवण तलावातील विद्युत मोटारीद्वारे अनधिकृत पाणी उपसा चालू आहे.भविष्यातील पाणीटंचाई लक्षात घेता अवैध पाणी उपसा बंद करणे आवश्यक आहे असे पत्रक अप्पर जिल्हाधिकारी अंबाजोगाई येथे सादर करण्यात आले आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की,मौजे जीवाचीवाडी येथील साठवण तलावातील पाणी उपसा बंद करणे संदर्भात तहसील कार्यालय केज यांचा आदेश दिनांक १० / ०२/२०२५ रोजी मंडळ अधिकारी विभाग विडा व ग्राम महसूल अधिकारी यांनाअहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले होते.

तहसीलदार यांनी विद्युत मोटार काढण्या साठीदि.०४/०४/२०२५ रोजी आदेश काढण्यात आला होता,तहसीलदार यांनी आदेशित करून ही साठवण तलावातील विद्युत मोटारीने अवैध पाणी उपसा चालूच आहे.मौजे जिवाचीवाडी येथील साठवण तलावा तील विद्युत मोटारी काढून अवैध पाणी उपसा बंद करावा या संदर्भात पत्र सुभाष सखाराम सारुक यांनी तहसीलदार केज व अप्पर जिल्हाधिकारी अंबाजोगाई यांना सादर केले आहे.

# सप्तरंगने पाटोदा येथील जामिया इस्लामिया बहरुल उलूम मदरश्याला चार कंप्युटर दिले

## धार्मिक शिक्षणा सोबतच तंत्रज्ञानाचे शिक्षण गरजेचे - अरबाज पठाण

**प्रतिनिधी @ पाटोदा**

पाटोदा येथे दिनांक ७ में वार बुधवार रोजी बीड जिल्हातील सामाजिक कामात अग्रेसर असणारे सप्तरंग सामाजिक प्रतिष्ठाण बीड जिल्हा च्या वतीने सामाजिक दायित्व उराशी बाळगून मुस्लिम मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे गरजेचे आहे. याच उदात्त हेतूने सप्तरंग प्रतिष्ठान च्या वतीने पाटोदा येथील जामीया इस्लामिया बहरुल उलुम पाटोदा येथील विद्यार्थी करिता पाच संगणक देण्यात आले. यावेळी सप्तरंगचे संस्थापक अध्यक्ष अरबाज पठाण यांनी मुस्लिम विद्यार्थी दिन सोबत तंत्रज्ञान शिकताना आम्हाला पाहायचा आहे असे म्हटले. स्पर्धेच्या युगात मुस्लिम युवक टिकला पाहिजे राष्ट्र आणि समाजाची सेवा करताना तो सिद्ध झाला पाहिजे यासाठी सप्तरंग शिक्षण क्षेत्रात भरीव काम करेल असे अध्यक्ष म्हणून विश्वास दिला यावेळी दावत ए तब्लिग पाटोदाचे अमानुल्लाह साहब यांच्या हस्ते सदरील संगणक देण्यात आले.

सप्तरंग,सेवाभावी युवकांची नवी सदर

अरबाज पठाण यांनी दिल्लीत मुंबईत काम केले आहे अनेक संस्था नेते यांच्याशी संपर्क असल्याने बीडच्या युवकांना मोठी मदत करण्याची सर्वकष क्षमता असल्याने बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्यात अरबाज यांच्या सोबत करत्या . सुधारकांची फळी उभा राहिली आहे. यामुळे विधायक आणि रचनात्मक कार्यक्रम हाती घेऊन सप्तरंग म्हणजे सेवा करणाऱ्या पोरांची मोठी सदर म्हणून पुढे येते आहे.यावेळी पाटोदा नगरपंचायत चे नगसेवक आसेफ सेठ सौदागर अरबाज पठाण,अलीम सय्यद,अजमेर मणियार,रफिक पटेल, अस्लम कुरेशी, मुस्तकीम शेख,अफजल सय्यद,अजीम शेख,वसीम मणियार, अमन शेख,साजेद पाशा,शौकत पटेल,अजीज शेख,इम्रान पटेलनदीम शेख,सर्फराज शेख, या वेळी मुफ्ती जफर साहब यांनी सर्वांचे आभार मानले या वेळी मौलाना मोईज . मौलाना मजहर मौलाना आरबाज मौलाना जहूर पठाण चांद खान हुसैन खान तसेच सलीम सर तांबोळी यांच्या मार्गदर्शनाखाली खाली मराठी विषयाचे शिक्षक अमजद खान पठाण इंग्रजी गणित विषयाचे शिक्षक प्रा. सचिन गायकवाड सर अमजद खान पठाण हजर होते .



### अरबाज सारख्या नेतृत्वाची गरज -अमानुल्लाह साहब

आज मुस्लिम युवकांना दिशा देण्याची गरज आहे योग्य दिशा मिळाली नाही तर युवक व्यसन हिंसा आणि वाईट सवयित अडकतो. मात्र ज्यांना काळाच्या खुणा कळतात युवकांना दिशा देण्याची भूमिका आहे ज्यांना प्रशासनातलं ज्ञान आहे असे नेतृत्व समाजाला पुढे घेऊन जाऊशकते. अरबाज पठाण हे नेतृत्व मुस्लिमांना गरजेचे आहे. दिन आणि तालीम या दोन्ही गोष्टी आमच्या साठी महत्वाच्या आहेत. स्पर्धेच्या युगात मुस्लिम युवक मागे राहू नये या साठी तंत्रज्ञान गरजचे आहे आणि सप्तरंग प्रतिष्ठान कडून ते तंत्रज्ञान मदरशात आले आहे. अल्लाह ने दिलेली हिदायत पुण्यवान असल्याचे त्यांनी म्हटले.

## 'सस्ती अदालत 'मधून ५ प्रकरणांमध्ये सामंजस्य

परभणी (प्रतिनिधी)

परभणी येथील तहसील कार्यालयात शुक्रवार ०९ मे रोजी सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत आयोजित केलेल्या सस्ती अदालतमध्ये ५ प्रकरणे समुपदेशन व सामंजस्याच्या माध्यमातून मार्गी लावण्यात यश आले. अतिक्रमणमुक्त पाणंद व शेतरस्ते या विषयांवर शेतकर्यांना तात्काळ आणि सोपा न्याय मिळावा यासाठी विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी १६ एप्रिल रोजी परिपत्रक व २ मे २०२५ रोजी पत्रक जारी करून दर पंधरा दिवसांनी सस्ती अदालत आयोजित करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार शुक्रवारी येथील तहसील कार्यालयात सस्ती अदालचे आयोजन करण्यात आले होते. या सस्ती अदालतीत उपविभागीय अधिकारी दत्तु शेवाळे, तहसीलदार डॉ. संदीप राजपुरे, व नायब तहसीलदार (महसूल १) मधुकर क्षीरसागर यांच्या उपस्थितीत एकूण ११ प्रकरणांवर सुनावणी झाली. यापैकी ५ प्रकरणे समुपदेशन व सामंजस्याच्या माध्यमातून मार्गी लावण्यात यश आले, ही बाब विशेष उल्लेखनीय ठरली. मात्र, उर्वरित प्रकरणांमध्ये संबंधित पक्षकार अनुपस्थित असल्याने त्यावर तत्काळ कार्यवाही होऊ शकली नाही.या उर्वरित प्रकरणांची सुनावणी येत्या २३ मे २०२५ रोजी नियोजित सस्ती अदालतीत करण्यात येणार असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी यांनी दिली.

या अदालतीस मंडळ अधिकारी नंदकिशोर सोनवणे, विकास आगलावे, एन.आर. सोडगीर, संचिन शिंदे, उद्धव सरोदे व ज्योती अढागळे यांची उपस्थिती होती. तसेच एकूण ५७ शेतकर्यांनी यामध्ये सहभाग घेतला. सस्ती अदालत उपक्रमामुळे शेतकर्यांना थेट प्रशासनाच्या माध्यमातून न्याय मिळण्याचा मार्ग सुकर झाला असून, यामुळे ग्रामस्तरावरच्या शेतविवादांवर सामजस्याने तोडगा निघण्याची शक्यता वाढली आहे.



# संस्कार आणि शिस्त हेच जीवनाचे सूत्र - डॉ. नागेश कराळे

**प्रतिनिधी @ केज**

मानवी जीवन हे अनेक प्रश्न,उत्तरे आणिअनुभव यातून भरलेले आहे. यात सुख दुःख,संकटे आणि संघर्ष अटळ असून अनपेक्षित आणि आपत्कालीन घडणाऱ्या घटनाही आहेत.यावर मात करण्यासाठी बीएड अध्यापनात झालेले संस्कार व शिस्त हे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन डॉ.नागेश कराळे यांनी केले.ते भाऊसाहेब पाटील अध्यापक महा विद्यालय केज येथे बीएड् द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांच्या निरोप समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.हनुमंत सौदागर हे होते.त्यावेळी प्रा.जयश्री कचरे,प्रा.उषा बलाढ्ये व श्री.सुजित नाईकवाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाचे अध्यक्ष समारोप प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. सौदागर म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या जीवना तील बी एड् वर्ष हे अत्यंत महत्त्वाचे आहेत.जीवनाची दिशा ठरवणारे असून आपल्याला कर्तव्याची जाणीव करून देणारे असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन विलास कांबळे यांनी केले तर आभार पूजा भोसले यांनी मानले.यावेळी बीएड अध्यापक छात्र हे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हंबर्डे कॉलेजचे दोन मावसभाऊ विद्यार्थी जीवशास्त्रात नव्वदी पार

**प्रतिनिधी @ आष्टी**



आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित अँडव्होकेट बी. डी. हंबर्डे महाविद्यालयाने इयत्ता बारावी बोर्ड परीक्षेत नेत्रदीपक यश संपादन केले असून, पठाण आर्शान इम्रान आणि सय्यद अमन अल्ताफ या दोन सख्या मावस भावांनी जीवशास्त्र विषयात अनुक्रमे ९१ आणि ९४ गुण मिळवून नव्वदी पार केली आहे.

त्यांच्या या यशात प्रा. सचिन कल्याणकर, प्रा. चंद्रकांत मडके, प्रा. संजय भांडवलकर, प्रा. विष्णू चौधरी, प्रा. संजू कोल्हे, प्रा. चंद्रकांत कोकणे, प्रा. जितेंद्र राळेभात, प्रा. बबन उकले, प्रा. विजय गव्हाणे, प्रा. राजेंद्र करांडे, प्रा. अनंत खोसे यांचे मार्गदर्शन त्यांना लाभले. जीवशास्त्रात दोन्ही मावसभावांनी मिळवलेल्या या यशाबद्दल संस्थाध्यक्ष किशोर नाना हंबर्डे, अतुल शेठ मेहेर, दिलीप शेठ वर्धमाने, डॉ. प्रताप गायकवाड, डॉ. गणेश पिसाळ, सुभान शेठ पठाण, प्रा. महेश चवरे आणि सर्व संचालक मंडळ, प्राचार्य डॉ. सोपानराव निंबोरे, उपप्राचार्य डॉ. बाबासाहेब मुटकुळे, उपप्राचार्य अविनाश कदले, पर्यवेक्षक प्रा. अशोक भोगाडे, कार्यालयीन अधिक्षिका सरस्वती जाधव यांनी अभिनंदन केले आहे. सुप्रसिद्ध कवी प्रा. सय्यद अल्लाउद्दीन हे या दोन्ही विद्यार्थ्यांचे काका आहेत.

# अल्पवयीन मुलीशी बळजबरीने विवाह आणि अत्याचार

### आंतरराज्य टपली पत्रावर शहर पोलिसात गुन्हा दाखल

परळी / प्रतिनिधी

अल्पवयीन मुलीशी बळजबरीने विवाह करून वारंवार अत्याचार केल्याची घटना परळी शहरात उघडकीस आली असून पीडित अल्पवयीन मुलीने तेलंगणा राज्यात दिलेल्या फिर्यादीनुसार परळी शहर पोलिसांकडे गुन्हा वर्ग केला आहे. या प्रकरणात शहर पोलीस ठाण्यात बाल विवाह प्रतिबंधक कायदा, बाल लैगिंक अत्याचार कलमा अंतर्गत तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार तेलंगणा राज्यातील फलकनुमा येथील १४ वर्षीय अल्पवयीन मुलगी ही परळी शहरातील पेठ मोहल्ला या ठिकाणी वास्तव्यास होती. अल्पवयीन मुलीच्या इच्छेविरुद्ध आरोपी यांनी संगणमत करून फिर्यादी (रा. हैद्राबाद) ही अल्पवयीन आसल्याचे माहीत असताना यातील आरोपी नामे शेख आमिन शेख मुस्सा याचे सोबत बालविवाह लावुन दिला त्यानंतर यातील फिर्यादी ही तीचे सासरी नांदत असताना तीचेवर यातील आरोपी याने फिर्यादी चे ईच्छेविरुध्द बळजबरी वारंवार अत्याचार केला. त्यानंतर रमजान ईद सनानिमीत्त यातील फिर्यादी हीला आरोपी याने तीचे माहेरी हैद्राबाद येथे नेवुन सोडल्यानंतर दि ५ एप्रिल २०२५ रोजी फिर्यादी हीने पोलीस ठाणे फलकनुमा, हैद्राबाद राज्य तेलंगाणा येथे जावुन तक्रार दिल्याने त्या ठिकाणी ०-४/२०२५ प्रमाणे गुन्हा नोंद करुन सदर गुन्हयाचे घटनास्थळ हे पोलीस ठाणे परळी शहर हद्दीतील असल्याने सदर गुन्हयाचे कागदपत्र टपालाने शहर पोलिस ठाण्यात दाखल झाल्याने या प्रकरणी परळी शहर पोलीस ठाण्यात गु.र.न. व कलम- १०६/२०२५ कलम १० बालविवाह प्र.अधि. सह कलम ६४ (२) (च्), ६५ (१) इछड सहा कलम ५ (१), ६ बाल लैंगिक, अत्या. प्र.अधि. कलमानुसार शेख आमिन शेख मुस्सा (वय ३६ वर्ष रा. पेठ मोहल्ला परळी वै. जि.बीड ), सय्यद सबिया, गुलाम गौसोदिन (दोन्ही रा. फातीमा नगर हैद्राबाद) व इतर यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी अधिक तपास सपोनि गड्डुवार हे करत आहेत.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# व्यक्ती परिचय वाढदिवसाच्या निमित्ताने

प्राचार्य डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड सामाजिक, शैक्षाणिक,ग्रंथालयीन क्षेत्रातील अवलीया व्यक्तिमत्व वसुदेव आश्रुबा गायकवाड यांचा जन्म आनंदगांव ता.केज जि.बीड या गावात झाला. लहाणपणा पासूनच अतिशय हुशार आणि सर्व क्षेत्रात पारंगत असे व्यक्तीमत्व.वडिल किर्तनकार असल्यामुळे लहाणपणा पासूनच आध्यात्माशी नाते जुळले,विविध अध्यात्मिक ग्रंथ वाचन, अर्थ सांगणे,प्रवचन देणे इत्यादी स्वरूपाचे अध्यात्मिक कार्य केले.

लहाणपणा पासून शिक्षण क्षेत्रात विलक्षण कुशाग्र बुद्धीमत्तेचा विद्यार्थी म्हणून शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थी म्हणून सतत प्रथम श्रेणीत येण्याची किमया केली.शाळा - महाविद्यालयीन या शिक्षणाच्या काळात वक्तृत्व,वाद -विवाद, काव्यवाचन,निबंध लेखन या क्षेत्रात तालुका,जिल्हा,विभाग व राज्यस्तरीय २२७ पुरस्कार मिळविले.

पुढे १९९६ या वर्षी सामाजिक क्षेत्रात काम करण्यासाठी आपल्या मित्रपरिवाराला सोबत घेवून आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण आनंदगांव ता.केज जि. बीड या संस्थेची स्थापना केली.१९९७ या वर्षी स्वानंद सार्वजनिक वाचनालय आनंदगांव ता.केज. जि.बीड आणि युवा क्रिडा मंडळ व व्यायाम शाळा आनंदगांव.ता. केज.जि.बीड या संस्थांची स्थापना केली. तसेच १९९७ ला आदर्श महिला मंडळ आनंद गांव ता.केज.जि.बीड या महिला संस्थेचीही स्थापना केली.पुढे जावून राजर्षी शाहू महाराज सार्वजनिक वालनालय,आशासोशल एज्यूकेशन सोसायटी, साधना सार्वजानिक वाचनालय,सानेगुरुजी सार्वजनिक वाचनालय, गंगाई सार्वजनिक वाचनालय,भगवान बाबा सार्वजनिक वाचनालय,आनंद कृषी वाचनालय अशा विविध संस्थांची स्थापनाकरून संस्थांचे काम वाढविले. यातील बहुतांश संस्था आपल्या सहकाऱ्यांना कायमस्वरूपी चालवायला दिल्या. कार्यकर्ते,सहकारी कसे सांभाळावे याचे मुर्तीमंत उदाहरण म्हणून प्राचार्य डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांच्याकडे पाहिले जाते.संपूर्ण महाराष्ट्रात जल,जमीन, जंगल,जन,जनावर, शिक्षण,आरोग्य,आहार, रोजगार,शेती,शेतकरी, पाणी,पर्यावरण, वातावरण बदल, पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम,पाणीपुरवठा योजना,गांडूळ खत प्रकल्प,दुग्ध व्यवसाय व शेळीपालन प्रशिक्षण, परसबाग,उन्हाळीशाळा,निरंतर शिक्षण केंद्रे, नर्सरी,वृक्षारोपण,स्वयं सहाय्यता गटाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण,शेतकरी मंडळे,विवाहपूर्व समुपदेशन व विवाह पश्यात समुपदेशन, अमृत सेवा प्रकल्प, पंचायतराज व ग्राम सभा सक्षमीकरण,संत गाडगेबाबाग्रामस्वच्छता अभियान,बालकामगार कायदेविषयक जन जागरण,उसतोड कामगार कायदेविषयक जनजागरण,सेंद्रीयशेती, भटके विमुक्त बालवाडी प्रकल्प.समाजसेवा शिबीर,स्वयंरोजगार मार्गदर्शन शिबीर.

ग्रंथालयाच्यामाध्यमातून बालक बालिका,कुमार वयोगट,युवक - युवती, महिला -पुरुष,जेष्ठ नागरीक सर्वांनाच मुक्त प्रवेशद्वार असे ग्रंथालयाचे उपक्रम राबविले.ग्रंथमांडणी विभाग,ग्रंथ देवघेव विभाग,वाचनकक्ष, बालविभाग,महिला विभाग,संदर्भ विभाग, स्पर्धा परिक्षा विभाग, अध्यात्मीक विभाग, कथा - कादंबरी विभाग, नाट्य विभाग,कला विभाग,ऐतिहासीक ग्रंथ विभाग,शेतकरीविभाग, सांस्कृतिक विभाग या विविध माध्यमातून ग्रंथालय वाचकांशी व वाचकांना ग्रंथांशी जोडण्याचे कार्य केलेले आहे.युवा क्रिडामंडळ व व्यायाम शाळा या माध्यमातून ही विद्यार्थी, युवक,युवती यांच्या साठी क्रिडा विषयक कार्य केलेले आहे.

संस्थेला जिल्हास्तरीय एक व मराठवाडा विभागस्तरीय एक जिल्ह्यातून एका संस्थेला देण्यात येणारा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते तर मराठवाडा विभागातून एका संस्थेला देण्यात येणारा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पुरस्कार देवून राज्य व केंद्र शासना कडुन सन्मानीत करण्यात आलेले आहे.सामाजिक व शैक्षणीक क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन प्राचार्य डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांना अनेक राज्यस्तरीय व राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कारांनी सन्मानीत करण्यात आले आहे.

उदा.समाजसेवा राज्यस्तरीय पुरस्कार,समाजभुषण राज्यस्तरीय पुरस्कार व अनेक राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मान. राष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मान उदा.डॉ.बाबासाहेब आबेडकर मेमोरियल राष्ट्रीय पुरस्कार,नेल्सन मंडेला राष्ट्रीय पुरस्कार, महात्मा फुले राष्ट्रीय पुरस्कार,स्वामी विवेकानंद राष्ट्रीय पुरस्कार,रविंद्रनाथ टागोर राष्ट्रीय पुरस्कार, मदर तेरेसा राष्ट्रीय पुरस्कार,महात्मा गांधी मेमोरियल राष्ट्रीय पुरस्कार या व इतर अनेक राज्य व राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानीत झालेले सामाजिक, शैक्षणिक,ग्रंथालयीन क्षेत्रातील बहुआयामी व्यक्तीमत्व म्हणजे प्राचार्यडॉ.वसुदेव बप्पा गायकवाड होत.प्राचार्य डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांचा थोडक्यात व्यक्ति परिचय देत आहे.



# जिल्हाधिका-यांचा बिनकामाचा जनता दरबार

## पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभार विरोधात दाद मागणा-या पाटोदा तालुक्यातील पाचेगाव येथील शेतकऱ्यांचा अपेक्षाभंग :- डॉ.गणेश ढवळे

**प्रतिनिधी @ बीड**

पाटोदा तालुक्यातील पाचेगाव येथील पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभारामुळे वैतागलेले शेतकरी पवनचक्की कंपन्यांकडून होणारी आर्थिक पिळवणूक आणि पोलिस प्रशासनाची दडपशाही या विरोधात न्याय मागण्यासाठी दि.८ गुरूवार रोजी जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयातील जनता दरबारात न्यायाच्या प्रतिक्षेत असताना जिल्ह्याच्या सर्वोच्च पदावर बसलेल्या जिल्हाधिकारी यांनी त्यांना न्याय देण्यास असमर्थता दर्शवली व पाटोदा उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांच्याकडे दाद मागा मी यात काहीही हस्तक्षेप करू शकत नाही अशी हतबलता दर्शविल्याने अखेर शेतकऱ्यांनी आपली नाराजी दर्शवली व हा तर जिल्हाधिका-यांचा बिनकामाचा जनता दरबार अशी संतप्त प्रतिक्रिया दिली आहे.जिल्हाधिकारी बीड यांनी आठवड्यातून ३ दिवस सोमवार, मंगळवार आणि गुरुवार सकाळी ११ ते २ या वेळेत जनता दरबार घेऊन सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारी ऐकल्या जातील व त्यांच्या तक्रारींचा निपटारा करण्यात येईल असा बीडकरांना विश्वास दिला.याविषयी भरपूर दैनिकातुन प्रसिद्धीही झाली. त्यामुळे वारंवार तक्रारी करूनही समस्या न सुटलेल्या नागरीकांना जिल्हाधिकारी यांना प्रत्यक्ष भेटून आपले गा-हाणे मांडुन आपले प्रश्न सुटणार अशा आशा पल्लवित झाल्या होत्या मात्र त्या फोल ठरल्याची प्रतिक्रिया पाटोदा तालुक्यातील पाचेगाव येथील शेतकऱ्यांनी दिली आहे. जनता दरबारात



नागरीकांच्या तक्रारी अनुषंगाने संबंधित विषयांच्या अधिकाऱ्यांना (फोनवर )बोलुन विषय मार्गी लावण्याचे आदेश दिले जातील आणि जिल्ह्यधिकारी यांनी आदेश दिल्याने आपल्या समस्या मार्गी लागतील अशी भावना असते.त्यामुळे तक्रारदार नागरीकांचे निदान समाधान तरी होते. दि.०७ मे बुधवार रोजी सकाळी पाटोदा तालुक्यातील पाचेगाव येथील शेतकऱ्यांना मावेजा न देताच शेतातुन विद्युत तारा ओढण्याचे काम पोलिस बंदोबस्तात जबरदस्तीने होत होते.याला शेतकऱ्यांनी विरोध केला त्यामुळे त्याठिकाणी काही काळ कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता. सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे हे सुद्धा शेतकऱ्यांच्या विनंती वरून घटनास्थळी पोहोचले. त्यांना शेतकऱ्यांनी पवनचक्की कंपन्यांनी आर्थिक फसवणूक केली असुन मावेजा न देणे,कमी जास्त मावेजा देणे, न वटणारे धनादेश देणे व मावेजा मागितल्यावर पोलिस प्रशासनाच्या मदतीने दडपशाही असे प्रकार सुरू असल्याचे सांगितले.याविषयी उपस्थित पोलिस उपनिरीक्षक आदिनाथ भडके पाटोदा पोलिस स्टेशन यांच्याशी डॉ.गणेश ढवळे यांनी व शेतकऱ्यांनी संवाद साधला असता. सशुल्क पोलिस संरक्षण मागितल्याने आमची कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये हि आमची जबाबदारी असुन मावेजा मिळणे,काम थांबविणे आमच्या हातात नसुन तुम्ही जिल्हाधिकारी यांच्याकडून काम थांबविण्याचे आदेश आणा असे सांगितले. त्यानंतर पाचेगाव येथील १० शेतकरी यांनी दुपारी भाड्याने गाडी करून पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभार विरोधात जिल्हाधिकारी यांना लेखी तक्रार दिली.त्यांना दुसऱ्या दिवशी जनता दरबारात बोलावले.काल दि.०८ गुरुवार रोजी आठवडी बाजार असतानाही शेतकरी पुन्हा भाड्याने गाडी करून जिल्हाधिकारी यांना भेटून मावेजा न देताच तारा ओढत असुन ते काम मावेजा मिळेपर्यंत थांबवावे अशी विनंती केली.जिल्हाधिकारी यांनी पवनचक्की कंपन्यांनी सशुल्क संरक्षण मागितले असल्याने मला काम थांबवता येत नाही असे म्हणत तुम्ही पाटोदा तालुक्यातील उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना भेटून ते ठरवतील तो मावेजा घ्या.मला यात काहीही करता येत नाही असे सांगितले आणि पाटोदा येथील उपविभागीय अधिकारी अथवा तहसीलदार यांच्याशी फोनवरून सुचना न देताच आल्या पावली घरी पाठवले. त्यामुळे आता पिडीत शेतकऱ्यांना असा प्रश्न पडला की जिल्हाधिकारी यांच्या हातात काही नाही तर मग आम्हाला गाडी भाडे करून दुसऱ्या दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयात का बोलावले????? त्यामुळे पाचेगाव शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या जनता दरबाराला बिनकामाचा दरबार भरत असल्याची संतप्त प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांच्याशी बोलताना दिली.



# मान्सून २७ मे रोजी केरळात पोहोचण्याची शक्यता

**प्रतिनिधी @ नवी दिल्ली**

नैऋत्य मान्सून देशात नियोजित वेळेपेक्षा ४ दिवस आधी पोहोचण्याची अपेक्षा आहे. भारतीय हवामान खात्याने अंदाज वर्तवला आहे की तो २७ मे रोजी केरळच्या किनाऱ्यावर पोहोचेल. साधारणपणे मान्सून १ जून रोजी येतो.हवामान खात्याच्या मते, ८ जुलैपर्यंत मान्सून संपूर्ण देश व्यापेल. जर मान्सून २७ मे रोजी आला तर २००९ नंतर पहिल्यांदाच तो केरळमध्ये इतक्या लवकर पोहोचेल. २००९ मध्ये मान्सून २३ मे रोजी केरळमध्ये पोहोचला होता.देशातील एकूण पावसापैकी ७०% पाऊस मान्सून हंगामात पडतो. देशातील ७०% ते ८०% शेतकरी पिकांच्या सिंचनासाठी पावसावर अवलंबून आहेत. याचा अर्थ असा की चांगला किंवा वाईट मान्सूनचा थेट परिणाम उत्पादनावर होतो.जर मान्सून खराब असेल तर पिकांचे उत्पादन कमी होते, ज्यामुळे महागाई वाढू शकते. भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचा वाटा सुमारे २०% आहे. त्याच वेळी, कृषी क्षेत्र देशाच्या अर्ध्या लोकसंख्येला रोजगार प्रदान करते.चांगला पाऊस पडल्यास शेतीशी संबंधित लोकांना सणासुदीच्या आधी चांगले उत्पन्न मिळू शकते. यामुळे त्यांची खर्च करण्याची क्षमता वाढते





# पुलाच्या कठड्याला धडकून कार ट्रॅव्हल्सवर आदळली, बाप-लेक ठार:तीव्र उतारावर चालकाचे नियंत्रण सुटल्याने पाटोद्याजवळ घडला अपघात

**प्रतिनिधी @ पाटोदा**

भरधाव कारच्या चालकाचे तीव्र उतारावर नियंत्रण सुटल्याने कार सुरुवातीला पुलाच्या कठड्याला धडकून नंतर समोरुन आलेल्या ट्रॅव्हल्सवर जाऊन आदळली. या अपघातात पिता-पुत्राचा जागीच मृत्यू झाला. पाटोदा शहराजवळ असलेल्या बामदळवाडा येथे गुरुवारी मध्यरात्री हा अपघात घडला.

अल्ताफ अशपाक शेख (४२), अलमस अल्ताफ शेख (१५, दोघे रा. पुणे) अशी मृतांची नावे आहेत. ते केज येथे काही कामानिमित्त आले होते. त्यांची कार वेगात असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि कार थेट पुलाच्या कठड्याला जाऊन धडकली. त्यानंतर दोन ते तीन वेळा पलटी होऊन कार ट्रॅव्हल्स वाहनावर आदळली. धडकेत कारचा अक्षरशः चक्काचूर झाला आणि दोघांचाही जागीच मृत्यू झाला. घटनास्थळी पोलिस उपनिरीक्षक भडके व बीट अंमलदार सचिन तांदळे यांनी तातडीने भेट देऊन पाहणी केली. मृतदेह बाहेर काढून उत्तरीय तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले होते.

# लोकपत्रकार लोकांसाठी लोकसेवेत अग्रेसरच..!

## कोणत्याही भुरट्या नेत्याने यांची दखल घेतली नाही.पत्रकाराने माणुसकी धर्म पाळला



**प्रतिनिधी @ वडवणी**

परळी हायवे वरती दि.९ शुक्रवार रोजी दुपारी १२ वाजे च्या सुमारास बीड परळी रोड लगत शेती आसणाऱ्या शेतकऱ्याने शेतकऱ्याने आपली शेतीतील कामे पूर्ण करत आसताना .शेतीतील काहीश्या भागातील जवळीलच शेतकऱ्यांचे शेतीचे मशागत सुरू होती . हे करत असताना घाटसावळी व ढेकानमोह या दोन्ही गावांच्या मध्ये म्हणजेच बकरवाडी फाटा येथे शेतकऱ्याने आपल्या शेतीतील बांधावरील छोटे-मोठे काटेरी झाडे व बांध हे दुपारच्या वेळेस आग लावण्यात आली होती. आगीच्या परिणामाने रोडवरील असलेले देखील एक खूप मोठ्या झाडाने देखील लावलेल्या आगे मुळे झाडा ने पेट घेतला होता . ही आग अंदाजे लवकरात लवकर विजवण्यात न आल्याने झाडावरती खूप मोठा परिणाम झाला व ते झाड उसळून बीड परळी हायवे रस्त्यावरती पडले होते. तब्बल या झाडामुळे चार ते पाच तास हा रस्त्यातील एक साईट पूर्णपणे तिथे अडथळा होत होता. कोणत्याही स्थानिक प्रशासनाने व नेत्यांनी याची कसलीही जाता-येता दखल घेतली नाही व त्यास योग्य त्या दिशेने हलवण्याचा प्रयत्न हे देखील केला नव्हता. त्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना खूप याचा त्रास होत होता. परंतु बीड येथून येत असताना लोकपत्रकार बाप्पासाहेब भांगे यांच्या निदर्शनास आले. त्यांनी तात्काळ तिथे थांबून तेथील नागरिकांना व रोडवरील येणाऱ्या जाणाऱ्यांना येथे थांबून त्यांच्या मदतीने ते झाड तात्काळ योग्य त्या ठिकाणी सरकून रस्ता पूर्णपणे सुरळीत केला. आणि यामध्येच लोक पत्रकार आणि माणुसकी धर्म पाळला. लोकपत्रकार हे बीड जिल्ह्यात ऊसतोड मजुरांच्या संघटनेचा राज्य संघटक म्हणून काम करतात. त्याच्या माध्यमातून देखील सामाजिक कार्य करत त्यांचं नाव अग्रगण्य आहे. पण महाराष्ट्र पडलेला मोठे झाड साईडला केल्यामुळे. पत्रकारितेचा कोहिनूर उघडा पडला.

त्यामुळे तेथील रात्रीच्या वेळेस येणाऱ्या जाणाऱ्यांना जो काय त्रास होणार होता. तो मात्र यांच्या माणुसकीच्या कामगिरीतून नाहीसा केला. आणि तेथील वाहतूक त्यांच्या कमगिरीतून सुरळीतपणे सुरू झाली. तर महाराष्ट्रभर झाडे लावा झाडे जगवा हा उपक्रम पूर्ण राज्यभरात देशात सुरू आहे. मात्र काही ठिकाणी अशा अवैधरित्या झाडांची तोड किंवा अन्य कोणत्याही पद्धतीने झाड हे नाहीसे केले जाते यास कोण जबाबदार असा देखील प्रश्न उपस्थित होत आहे. मात्र या सर्व घटनेमध्ये लोकपत्रकार यांनी माणुसकी दाखवली.

# बांगरवाडीला अध्यात्मिक केंद्राबरोबरच ज्ञान केंद्र ही बनवू - आ. सुरेश धस

## श्री दत्तप्रभू व हनुमंतराय मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा उत्साहात

**प्रतिनिधी @ पाटोदा**

पाटोदा नगरपंचायतीच्या हद्दीतील बांगरवाडी गावाने नव्या अध्यात्मिक व बौद्धिक पर्वाकडे वाटचाल सुरू केली आहे. येथील श्री दत्तप्रभू व महाबली हनुमंतराय यांच्या भव्य मूर्तींची प्राणप्रतिष्ठा सोहळा गुरुवारी दि. ८ मे रोजी मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात उपस्थित आमदार सुरेश धस यांनी गावातील तरुणांसाठी अभ्यासिकेची निर्मिती करून 'बांगरवाडीला अध्यात्मिक केंद्राबरोबरच ज्ञान केंद्र देखील बनवू,' अशी महत्त्वपूर्ण ग्वाही दिली.या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात महंत सतीश महाराज उरणकर, ह.भ.प. लक्ष्मण महाराज सस्ते, नगरपंचायत सभापती हनुमंत काळे, तसेच अनेक अध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. यावेळी सतीश महाराजांनी रसाळ वाणीने श्री दत्तप्रभू व हनुमंत भक्तीचे महत्त्व सांगितले. सुंदरकांडाचे प्रवचन आणि विविध धार्मिक विधींनी वातावरण भारावून गेले होते.सोहळ्याच्या पूर्वसंध्येला, बुधवारच्या दिवशी गावात हनुमान व दत्तप्रभूंच्या मूर्तींची ट्रॅक्टरमधून भव्य मिरवणूक काढण्यात आली. फुलांनी सजवलेली मूर्ती, ढोल-ताशांच्या गजरात गावभर फिरवण्यात आली आणि शेकडो भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला.प्रसंगी बोलताना आमदार सुरेश धस म्हणाले, बांगरवाडीतील तरुणांना स्पर्धा परीक्षा व विविध शैक्षणिक संधींसाठी योग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी लवकरच अभ्यासिका उभारण्यात येईल. अध्यात्म आणि विज्ञान यांचा समन्वय साधून नव्या पिढीने प्रगतीचा मार्ग स्वीकारावा.नायगावमधील जिल्हा परिषद शाळेतून शिक्षण घेतलेल्या पंकज आवटे यांनी नुकतीच केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण करून इतिहास घडवला आहे. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून तरुणांनी सातत्याने अभ्यास केला, तर यश हमखास आहे, असेही आमदार धस म्हणाले.या उपक्रमामुळे गावातील ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले असून, अभ्यासासाठी चांगली जागा व आवश्यक साहित्य उपलब्ध झाल्यास तरुणांना निश्चितच योग्य दिशा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.या कार्यक्रमात विठ्ठल रूपनर काळे. यांच्यासह शेकडो भाविक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. धार्मिक, अध्यात्मिक आणि सामाजिकदृष्ट्या समृद्ध असा हा सोहळा गावाच्या सर्वांगीण प्रगतीच्या दिशेने उचललेलं एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरला आहे.



# महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्यपदी प्रा. वनिता पाटील

लातूर (प्रतिनिधी)

श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्यपदी भौतिकशास्त्र विभागाच्या प्रा. वनिता पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या नियुक्तीबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्य कक्षामध्ये श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे सहसचिव सुनील मिटकरी, कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे, संचालक बस्वराज येरटे, प्राचार्य डॉ. संजय गवई, मुख्य समन्वयक डॉ. भास्कररेड्डी नल्ला आणि कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांची उपस्थिती होती.

प्रा. वनिता सी. पाटील यांचा जन्म एका शेतकरी कुटुंबात यांच्या घरी झाला. कोणत्याही प्रकारची शैक्षणिक पार्श्वभूमी नसताना अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत त्यांनी शिक्षण पूर्ण केले. त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण लालबहादुर शास्त्री शाळा, उदगीर येथे पूर्ण झाले. त्यानंतर उच्च माध्यमिक आणि पदवीचे शिक्षण त्यांनी शिवाजी महाविद्यालय, उदगीर येथून पूर्ण केले. त्यानंतरचे पदव्युत्तर शिक्षण एम. एस्सी. फिजीक्स डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथे घेतले. बि.एड.चे शिक्षण शासकीय महाविद्यालय, परभणी येथे झाले.

तदनंतर १९९१ सालापासून त्या सेवेत कार्यरत आहेत आणि महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात त्या १९९२ साली रुजू झाल्या. महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात त्यांनी अनेक समित्यांवर उत्कृष्ट कार्य केले. आहे. भौतिकशास्त्र विषयाच्या विद्यार्थी प्रिय प्राध्यापिका म्हणून त्यांची ओळख सर्वदूर आहे. महाविद्यालयातील अनेक गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना त्यांनी वेळोवेळी मदत करून योग्य दिशा दाखवली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली असंख्य विद्यार्थी आज वेगवेगळया ठिकाणी मोठमोठ्या पदांवर कार्यरत आहेत आणि आपापली जबाबदारी चोखपणे बजावत आहेत.त्यांच्या या नियुक्ती बद्दल श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसेचिंचोलीकर, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर आणि सर्व संचालक, स्टाफ सचिव डॉ. रत्नाकर बेडगे, विज्ञान शाखा समन्वयक तथा भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सिद्राम डोंगरगे, माजी उपप्राचार्य प्रा. संजय पवार, स्टाफ सचिव प्रा. रवींद्र सुरवसे, बोर्ड समन्वयक डॉ. गुणवंत बिरादर, सर्व शाखा समन्वयक, विभागप्रमुख, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.



# शिवणीमध्ये बुद्ध जयंती निमित्त पहिल्यांदाच होणार रात्रभर महापरित्राण पाठ महोत्सव

## तथागत बुद्ध रुप प्रतिष्ठापना, अनावरण सोहळा - भिक्खु धम्मशिल थेरो

बीड (प्रतिनिधी)

या जगाला प्रज्ञा, शिल, करुणेची शिकवण देणाऱ्या तथागत सिध्दार्थ गौतम बुद्ध यांच्या २५६९ व्या जयंती निमित्ताने तथागत बुद्ध रुप प्रतिष्ठापना व अनावरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे.हा बुद्ध जयंती महोत्सव बीड तालुक्यातील शिवणी येथील महाविहार धम्मभूमी डॉ.भदन्त आनंद कौसल्यायन नगर, येथे सोमवार दि.१२ मे रोजी संपन्न होत आहे. प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था,बीड विनीत बुद्ध जयंती महोत्सवात उपस्थित रहावे असे आवाहन मुख्य संयोजक भिक्खु धम्मशिल थेरो यांनी केले आहे.

या कार्यक्रमाचे उदघाटक डॉ.भिक्खु उपगुप्त माथेरो तर अध्यक्ष म्हणून भिक्खु इंदवंस्स, प्रमुख उपस्थिती भिक्खु चंद्रमुणी असणार आहेत. प्रमुख धम्मदेसना भिक्खु महाकाश्यप थेरो, भिक्खु धम्मघोष, भिक्खु पय्यावर्धन तर



प्रमुख पाहुणे म्हणून बीड कलेक्टर विवेक जॉन्सन, सीईओ आदित्य जीवने, पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, समाज कल्याण सहाय्यक आयुक्त प्रदिप भोगले, नायब तहसीलदार सुहास हजारे, समाज कल्याण अधिकारी दत्तात्रय क्षीरसागर, अभियंता व्ही.एल.कांबळे, संपादक कुणाल कांबळे असणार आहेत. विशेष अतिथी म्हणून एमएसआरडीसी मुंबईचे व्यवस्थापकीय संचालक इंजि.अनिल गायकवाड उपस्थित असणार आहेत. दरम्यान बुद्ध जयंती महोत्सवात उपस्थित रहावे असे आवाहन मुख्य संयोजक भिक्खु धम्मशिल थेरो यांनी केले आहे.

श्रीलंकेचे प्रशिक्षिक भिक्खु राहणार उपस्थित

बीडमध्ये पहिल्यांदाच श्रीलंका येथील भिक्खु अश्वजित थेरो, भन्ते शीलवान, भिक्खु बुद्धभुषण, उपस्थित राहणार असून सोमवार (दि.१२) मे रोजी सकाळी ९ ते सकाळी ६ पर्यंत रात्रभर महापरित्राण पाठ होणार आहे. उपासकांनी सहभागी होवून पुण्य अर्जित करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशाला केराची टोपली, आर्वीच्या ग्रामसेवकाविरुद्ध तक्रार

बीड /प्रतिनिधी

शिरूर कासार तालुक्यातील आर्वी येथील वडिलांच्या घरांचा पी.टी.आर. गेल्या ०७ महिन्यापासून मागणी करुन मिळत नसल्याची तक्रार सौ. जुलेखा भ्र. सिराज खान पि. महबूब शेख रा. शिरूर (का.) यांनी केली आहे. दरम्यान या प्रकरणी पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि. ४ ऑक्टोबर २०२४ रोजी पत्र देऊनही सदर ग्रामसेविकेने डेप्युटी सीईओ यांच्या पत्रालाही केराची टोपली दाखवली आहे.

अद्यापपर्यंत पीटीआर मुलांना मिळाला नाही. याप्रकरणी चौकशी करून कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, दिनांक २५ सप्टेंबर २०२४ रोजी सौ. जुलेखा खान पिता मेहबूब शेख यांनी निवेदन देऊन आर्वी येथील आपल्या वडिलांच्या जागेची पिटीआर'ची मागणी केली होती. मात्र विहित कालावधीत पी टी आर न मिळाल्यामुळे संबंधित महिलेने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सदर प्रकरणी अर्ज करून पी टी आर मिळण्याबाबत या विनंती केली होती. मात्र अद्याप पर्यंत काही कारवाई न झाल्यामुळे पुन्हा जुलै कारखान्यांनी दिनांक ९ मे रोजी अर्ज देऊन पी टी आर देण्यात यावा आणि याप्रकरणी चौकशी करण्यात यावी, अशी मागणी केली आहे.



# प्राचार्य राजेशकुमार राठोड यांचे निधन

बीड (प्रतिनिधी)

गेवराई तालुक्यातील जयराम तांडा, पाचेगाव येथील रहिवासी प्राचार्य राजेशकुमार बन्सीलाल राठोड (वय ५३) यांचे ८ मे रोजी रात्री ११ वाजता अपघाती मृत्यू झाला. त्यांच्या पार्थिवावर ९ मे रोजी दुपारी १२ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात वडील, आई, पत्नी, मुलगा, मुलगी व बहीण असा असा परिवार आहे. जयराम तांडा येथील सामाजिक कार्यकर्त्या चंद्रकलाबाई राठोड यांचा ते मुलगा होत.

# 'विद्रोही आंबेडकरी जलसा' कार्यक्रमास हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे - प्रशांत ससाणे

बीड (प्रतिनिधी)

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व बुध्द जयंती निमित्त सम्यक प्रतिष्ठाण बीड आयोजित विद्रोही आंबेडकरी जलसा हा भिमगीत प्रबोधनाचा कार्यक्रम रविवार, ११ मे २०२५ रोजी सायं. ६.३० वा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड, बीड येथे आयोजित करण्यात आला आहे. हा 'विद्रोही आंबेडकरी जलसा'चे उद्घाटक बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव पोटभरे हे असणार आहेत. तर जलसा कार्यक्रमाचे मार्गदर्शक म्हणून आर.एस.गायकवाड, महेंद्र शिंदे, विजय आगलावे, संदीप जोगदंड यांची उपस्थिती असणार आहे. या जलसा कार्यक्रमास हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन सम्यक प्रतिष्ठाणचे अध्यक्ष तथा बहुजन विकास मोर्चाचे जिल्हाध्यक्ष प्रशांत ससाणे यांनी केले आहे.

प्रत्येक वर्षी प्रमाणे याही वर्षी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून देशातील जात वर्ग-स्त्री दास्य (गुलामगिरी) अंताची विद्रोही गाणी, फुले-शाहू-आंबेडकरांचे विचार घरा-घरात पोहचविण्यासाठी डफावर थाप आणि विद्रोही सुर घेऊन विद्रोही आंबेडकर जलसा हा भिमगीत व प्रबोधनांचा कार्यक्रम आयोजित केला आहे. या कार्यक्रमास उपस्थित रहावे जेणे करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार व कार्य समाजातील तळागळातील प्रत्येक वंचित घटकापर्यंत पोहोचतील यासाठी सहपरिवार उपस्थित रहावे असे आवाहन सम्यक प्रतिष्ठाणचे अध्यक्ष प्रशांत ससाणे यांच्यासह शांतीदूत घोडके, वैभव वाघमारे, सचिन ससाणे, रोहन साळवे, सिध्दार्थ जोगदंड, अशोक हुंबरे, किरण ससाणे, प्रफुल गायकवाड यांनी केले आहे.

# जिल्हा क्रीडा केंद्र मार्फत सॉफ्टबॉल, बेसबॉल मैदानी खेळाचे प्रशिक्षण शिबिर

बीड (प्रतिनिधी)

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत राज्यतील प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रची स्थापना करून केंद्राच्या माध्यमातून जिल्ह्यातील खेळाडूंना नियमीत स्वरूपात कीडा प्रशिक्षण देण्यात येते.त्याअनुषंगाने जिल्ह्यामध्ये क्रीडा संस्कृतीचे सर्वधन, प्रचार, प्रसार व जोपासना करण्यासाठी पोषक वातावरण तयार व्हावे, तेच राष्ट्रीय व आतंरराष्ट्री स्तरावर दर्जेदार कामगिरी करण्यासाठी खेळाडूंना तंत्रशुध्द प्रशिक्षण मिळावे यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड आणि जिल्हा क्रीडा परिषद, बीड यांच्या संयुक्त विद्यामाने जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र याद्वारे सॉफ्टबॉल, बेसबॉल, मैदानी, या खेळांचे जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र अंतर्गत दि १५ में से २४ में २०२५ या कालावधीत शिबीराचे आयोजन जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे सकाळी ०७ ते १० वा. व सायंकाळी ०४:३० ते ०६:३० पर्यंत करण्यात आले आहे. जिल्ह्यातील जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रवर नियमीत प्रशिक्षण घेणारया खेळाडूंना सदर शिबीराचा लाभ घ्यावा. या शिबिरात सॉफ्टबॉल खेळासाठी श्री. सतिश राठोड, क्रीडा मार्गदर्शक बेसबॉल खेळासाठी श्री. रेवननाथ शेलार, क्रीडा मार्गदर्शक आणि मैदानी खेळासाठी श्री. अविनाश पाटील, क्रीडा मार्गदर्शक करणार आहेत.

अधिक माहितीसाठी श्री. सतिश राठोड (सॉफ्टबॉल क्रीडा मार्गदर्शक मो. न. ९९२५०१९३५३), श्री. रेवननाथ शेलार (बेसबॉल क्रीडा मार्गदर्शक मो. न. ९०७५४७६७५१), श्री. अविनाश पाटील (मैदानी क्रीडा मार्गदर्शक मो. न. ९६२३७८११२१) यांच्याशी संपर्क साधावा असे अवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. अरविंद विद्यागर यांनी केले आहे.

# शिवसेनेने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरास देशाभिमान दाखवत मुस्लिम तरुणांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद- उल्हास गिराम

बीड (प्रतिनिधी)

पाकिस्तानी दहशतवाद्या विरोधात भारतीय सैन्यानी सुरु केलेल्या युद्धात शहीद भारतीय जावनाच्या शौर्याप्रति सदभावना म्हणून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी आज बीड शहरांत रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरास देशाभीम असणाऱ्या तरुणांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला. विशेष म्हणजे मुस्लिम बांधवानी ही रक्तदान करून देशाप्रति सदभावना दाखवली.




याशिबिरास सह संपर्क प्रमुख बाळासाहेब अंबुरे, दैनिक झुंजार नेता चे संपादक अजित वरपे, दैनिक सामना चे जिल्हाप्रतिनिधी उदय जोशी सर, जिल्हा संघटक नितीन धांडे, उपजिल्हाप्रमुख हनुमंत जगताप, कर्मवीर परिवाराचे सोमनाथ धांडे, गणेश जाधव, राहुल जामकर, नंदकुमार येवले, सुरेश तात्या शेटे, माजी नगरसेवक सुधीर भांडवले, यांनी भेट दिली. या शिबिरास उपजिल्हाप्रमुख संजय महाद्वार, लक्ष्मण बहिरवळ सुशील पिंगळे, रतन तात्या गुजर, नवनाथ प्रभाळे, सरपंच प्रदीप कोटुळे, अतुल लोणकर, योगेश वादे, अझर सय्यद, ज्ञानेश्वर दाभाडे, सुजित गिराम, गिरीश गिराम, वैभव प्रभाळे, महेश भोसले, सौरभ इंगोले यासह अनेक तरुणांनी रक्तदान शिबिरास सहभाग नोंदवला.

# जोग महाराज वारकरी शिक्षण संस्थेचा वटवृक्ष बंकटस्वामींनी केला - राष्ट्रसंत भास्करगिरी महाराज देवगडकर

बीड (प्रतिनिधी)



महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय ही बंकटस्वामी महाराजांची कृपा आहे. आळंदी येथील जोग महाराज यांनी स्थापन केलेल्या वारकरी शिक्षण संस्थेचा वटवृक्ष करण्याच काम स्वामी महाराज यांनी केले असे प्रतिपादन राष्ट्रसंत शांतीब्रम्ह सद्गुरू भास्करगिरीजी महाराज देवगडकर यांनी केले. संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवास भेट दिली असता केले.

यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, श्री ह भ प स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज, श्री ह भ प महंत किसन महाराज पवार, श्री ह भ प नाना महाराज कदम, श्री ह भ प सुरेश म जाधव यांच्यासह हजारो भाविक भक्त उपस्थित होते.श्री क्षेत्र नेकनूर संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवात श्री क्षेत्र देवगड येथील राष्ट्रसंत शांतीब्रम्ह सद्गुरू भास्करगिरीजी महाराज यांनी आशीर्वादात्मक भेट दिली. श्री क्षेत्र नेकनूर पुण्यभूमी आहे.संतांची जन्म भूमी पुण्य भूमी आहे. या बंकटस्वामी महाराजांचा संस्थानच्या भौतिक आणि अध्यात्मिक विकासात लक्ष्मण महाराज मेंगडे यांचे खूपकार्य खूप चांगले सुरु आहे. २०० हून अधिक गरीब गरजू मुले अध्यात्माचे धडे गिरवत आहेत हे ऐकून समाधान वाटले.देवगड संस्थानला भागवत कथेची सेवा करण्याचा योग आला असे म्हणत संस्थानच्या कार्यास शुभेच्छा दिल्या. व आध्यात्मिक कार्याचा गौरव आणि कौतुक केले.

# वसंतराव काळे कॉलेज ऑफ जर्नालिझम अँड कॉम्प्युटर सायन्सच्या प्राचार्यपदी प्रा.रफिक सय्यद

बीड /प्रतिनिधी

बीड येथील नामवंत वसंतराव काळे कॉलेज ऑफ जर्नालिझम अँड कॉम्प्युटर सायन्स या महाविद्यालयाचे नवे प्राचार्य म्हणून प्रा.रफिक सय्यद यांनी नुकतेच पदभार स्वीकारला.

त्यांच्या नियुक्तीचा आनंद व्यक्त करत एम.ए.एम.सी.जे. विभागातील सर्व विद्यार्थ्यांच्या वतीने,महाविद्यालयाचे समन्वयक गणेश पोकळे यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य सत्कार सोहळा पार पडला.प्राचार्य सय्यद यांचा शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन विद्यार्थ्यांनी जल्लोषात सत्कार केला.यावेळी प्रा.सुहास गाढवे, गितांजली लव्हाळे वानखडे, प्रा.निसार शेख,सागर शिंदे, वैभव बालकुंदे, अण्णासाहेब साबळे, अजय भांगे, प्रदीप गायकवाड,विजय दराडे,विजय कापसे,दत्ता काशीद,रंजीत घाडगे,चव्हाण श्रेया,संजय आठवले,दत्ता घुगे,गोपाळ जोगडे,अर्जुन कदम,महेश विद्यासागर,सचिन कराळे,धनंजय जोगडे,महेश विद्यासागर आदी मान्यवर आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा.सय्यद सरांचं नेतृत्व आमच्यासाठी दीपस्तंभासारखं ठरेल, अशा शब्दांत विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रती अभिमान व्यक्त केला.आपल्या मनोगतात प्राचार्य रफिक सय्यद यांनी,विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास,गुणवत्ता वृद्धी व नवकल्पनांच्या आधारे



महाविद्यालयाची शैक्षणिक उंची वाढवणे हे माझे मुख्य उद्दिष्ट राहील, असे नमूद केले.चार दशकांहून अधिकचा शैक्षणिक आणि प्रशासकीय अनुभव लाभलेले प्रा.रफिक सय्यद हे विद्यार्थीहित संचलन,बौद्धिक मार्गदर्शन व नेतृत्वगुण यासाठी राज्यभर प्रसिद्ध आहेत.त्यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयात नवचैतन्याचे वारे वाहू लागले असून,आगामी काळात महाविद्यालयाच्या यशाचे नवीन पर्व सुरू होईल,असा विश्वास विद्यार्थ्यांनी व्यक्त केला.



चिंचोली - येथील कै.संतोष नाना पवार यांचे दुःखद निधन झाले असता पवार परिवारांना सांत्वन पर भेट देताना माजी आमदार नितीन पाटील साहेब यांच्यासह बाजार समिती संचालक कैलास आबा अकोलकर, चेअरमन रावसाहेब निकम पाटील, मनोज आप्पा देशमुख,त्रिंबक नाना पवार.